ग्रं. सं. ठाणें



# ज्ञानमार्गावरील प्रवचनें

स्वामी विवेकानंद

IRBK-0111386

श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

13 DEC 1975

17 SEP 1976

५।९५ ११३८६

# ज्ञानमार्गावरील प्रवचनें

७६०७३
30131७९
३५०८

स्वामी विवेकानंद

११३८६
IRBK-0111386

श्रीरामकृष्ण आश्रम
नागपूर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना : खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

13 DEC 1975

17 SEP 1976

प्रकाशक--
**स्वामी भास्करेश्वरानंद**
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम
धंतोली, नागपूर.

अनुवादक--
**प्रा. डॉ. नारायणशास्त्री द्रविड,**
एम्. ए., पीएच्. डी., न्यायाचार्य,
नागपूर.

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ५८ वें

(सर्व अधिकार श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सुरक्षित)

**मूल्य ९० पैसे**

मुद्रक--
**श्री. अं. पु. तापस,**
श्याम ब्रदर्स,
सुभाष रोड, नागपूर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ६६७५२ वि अ.आ.
क्रमांक ३५४७६ नोंद दि. २०।१२।६७

# प्रस्तावना

'ज्ञानमार्गावरील प्रवचनें' हें आमचें नवीन प्रकाशन वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. अमेरिकेत असतांना स्वामी विवेकानंदांचीं ज्ञानमार्गावर प्रवचनें झालीं आणि त्यांची एक सुप्रसिद्ध अमेरिकन शिष्या कुमारी एस्. ई. वॅल्डो यांनी तीं लिहून घेतलीं. स्वामी विवेकानंदांचे गुरुबंधु स्वामी सारदानंद हे जेव्हा इ.स. १८९६ सालीं अमेरिकेंत प्रचारकार्य करीत होते तेव्हा त्यांनी हीं प्रवचनें कुमारी वॅल्डो यांच्या वही-वरून जशींच्या तशीं उतरून घेतलीं. प्रस्तुत पुस्तक म्हणजे या प्रवचनांचा संग्रह होय.

स्वामी विवेकानंदांनी या प्रवचनांमधे साधकाला ज्ञानमार्ग हा मुक्तीच्या ध्येयाकडे कसा घेऊन जातो हें समजावून सांगितलें आहे. उपनिषदें आणि गीता यांच्या साह्याय्याने त्यांनी हा ज्ञान-मार्ग विशद करून सांगितला आहे. ज्ञानमार्गांत यशस्वी होण्यासाठी कोणते गुण व कोणती साधना आवश्यक आहे याचेंहि त्यांनी या प्रवचनांमधे सुबोध पद्धतीने विवेचन केलें आहे ज्ञानमार्गाचें अनुसरण करून आत्मज्ञानांत प्रतिष्ठित झालें म्हणजे शाश्वत सुखाची कशी प्राप्ति होते हेंहि त्यांनी या प्रवचनांमधे तर्कसंगत रीतीने पटवून दिलें आहे. आदर्श जीवन घडविण्याकरिता ज्ञानमार्ग हा कसा उपयुक्त आहे यासंबंधीचे स्वामी विवेकानंदांचे ओजस्वी विचार सर्वांनाच मार्गदर्शक ठरतील.

प्रा. डॉ. नारायणशास्त्री द्रविड, एम्. ए., पीएच् डी., न्यायाचार्य, नागपूर यांनी मूळ इंग्रजीतील प्रवचनांचा अनुवाद केला आहे. त्यांच्या या कार्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

१–५–१९६५ —प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| प्रवचन पहिलें | .. | .. | १ |
| प्रवचन दुसरें | .. | .. | ७ |
| प्रवचन तिसरें | .. | .. | १३ |
| प्रवचन चवथें | .. | .. | १९ |
| प्रवचन पांचवें | .. | .. | २४ |
| प्रवचन सहावें | .. | . | ३० |
| प्रवचन सातवें | .. | .. | ३६ |
| प्रवचन आठवें | .. | .. | ४५ |
| प्रवचन नववें | .. | .. | ५१ |



स्वामी विवेकानंद

# ज्ञानमार्गावरील प्रवचनें

## प्रवचन पहिलें

ॐ तत्सत्. ॐकाराचें स्वरूप जाणलें की विश्वाचें गूढ उकलतें. भक्तियोग व राजयोग यांचें जें अंतिम लक्ष्य आहे तेंच ज्ञानयोगाचेंहि आहे, पण त्याची पद्धति मात्र वेगळी आहे. हा योग बलवान साधकांसाठी आहे. जे गूढवादी (राजयोगी) किंवा भक्त नसून बुद्धिवादी आहेत त्यांच्यासाठी हा योग आहे. ज्याप्रमाणे भक्तियोगी प्रेम व श्रद्धा यांच्या द्वारें ईश्वराशीं पूर्ण ऐक्य प्राप्त करून घेतो त्याचप्रमाणे ज्ञानयोगी शुद्ध बुद्धीच्या मदतीने ईश्वरसाक्षात्कार प्राप्त करून घेतो. ज्ञानयोगी सर्व प्रकारच्या खुळचट समजुती, अंधविश्वास व आपले जुनेपुराणे आदर्श टाकून देण्यास तयार असला पाहिजे. त्याचप्रमाणे ऐहिक किंवा पारलौकिक जीवनाची कामना सोडून देऊन केवळ मुक्ति प्राप्त करून घेण्यासाठी त्याचा दृढ निश्चय असला पाहिजे. ज्ञानाशिवाय आपल्याला मुक्ति लाभूं शकत नाही. आपलें खरें स्वरूप काय आहे, आपण भीति, जन्म, मृत्यु इत्यादिकांच्या पलीकडील आहोंत हें जाणणें म्हणजेच मुक्ति होय. आत्मसाक्षात्कार हेंच श्रेय आहे, तीच सर्वोच्च अशी गोष्ट आहे. आत्मा हा इंद्रियें आणि मन यांच्या पलीकडे आहे. खरा 'मी' कधी आकलनीय होऊं शकत नाही. तो शाश्वत ज्ञाता वा विषयी आहे, तो ज्ञानाचा विषय कधीहि होऊं शकत नाही, कारण ज्ञान हें सापेक्षाचेच असतें,

निरपेक्षाचें नव्हे. सर्व इंद्रियजन्य ज्ञान हें मर्यादित असतें. तें म्हणजे अंत नसलेली कार्यकारणाची परंपरा होय. हें जग सापेक्ष आहे, सत्याची ती पडछाया आहे. तरीपण सुख व दु:ख यांच्या प्राय: समतोलाची ही भूमि असल्यामुळे, हेंच असें स्थान आहे की जिथें माणूस स्वस्वरूपाचा साक्षात्कार करून घेऊन 'मी ब्रह्म आहें' हें ज्ञान प्राप्त करून घेऊं शकतो.

हें विश्व म्हणजे 'प्रकृतीचा क्रमविकास आणि ईश्वराची क्रमाभिव्यक्ति' होय. तें म्हणजे मायेच्या पडद्यामधून आपल्याला आकलन होणारें निरपेक्ष ब्रह्माचें रूप होय. विश्व हें शून्य नाही. त्याला एकप्रकारची सत्ता आहे. ब्रह्म हें सत् असल्यामुळे हें विश्व भासमान होतें.

ज्ञात्याला आपण कसें जाणणार ?* वेदान्त म्हणतो, "आपण ब्रह्मच आहोंत,पण आपण ब्रह्माला कधी जाणूं शकत नाहीं, कारण तें ज्ञानाचा विषय कधीच होऊं शकत नाही." आधुनिक विज्ञानहि हेंच सांगतें की आपण अंतिम सत्य कधी जाणूं शकत नाहीं. तथापि या सत्याचें ओझरतें दर्शन आपल्याला मधून मधून प्राप्त होऊं शकतें. विश्वाचा हा भ्रम एकदा नष्ट झाल्यानंतरहि हें विश्व आपल्याला पुन्हा दिसेल, पण तें आपल्याला कधीहि सत्य वाटणार नाही. तें मृगजळासारखें आहे हें आपल्याला कळून येईल. या मृगजळामागील सत्तेप्रत पोहोचणें हेंच सर्व धर्मांचें अंतिम उद्दिष्ट आहे. माणूस आणि ईश्वर हे एक होत हीच सर्व वेदांची नेहमीची शिकवण आहे, पण फार थोडे लोक अज्ञानाच्या पडद्याचा भेद करून या सत्याचा साक्षात्कार करून घेण्यास समर्थ असतात.

* विज्ञातारमरे केन विजानीयात् । —बृहदारण्यक उपनिषद् २,४,१४

ज्ञान्याला जी पहिली गोष्ट दूर सारणें आवश्यक आहे ती म्हणजे भय ही होय. भय हा एक आपला एक फार मोठा शत्रु आहे. ज्ञान्याच्या पक्षीं आवश्यक असलेली दुसरी गोष्ट पुढील-प्रमाणे आहे : जोंवर तुम्हांला प्रत्यक्ष अनुभव येत नाही तोंवर कोणत्याहि गोष्टीवर विश्वास ठेवूं नका. स्वतःला नेहमी सांगा —"मी शरीर नाहीं, मी मन नाहीं, मी विचार नाहीं, मी अहं-कारहि नाहीं, मी आत्मा आहें." जेव्हा तुम्ही सर्वकांही बाजूला साराल तेव्हा केवळ आत्माच शिल्लक उरेल. ज्ञान्याचें ध्यान हें दोन प्रकारचें असतें : (१) जें आपण नाहीं त्याचा निषेध करणें व विचाराच्या साहाय्याने तें बाजूला सारणें; (२) आपलें खरें स्वरूप जो अद्वितीय सच्चिदानंद आत्मा त्याच्यावरच मन दृढपणें स्थिर करणें. जो खरा बुद्धिवादी आहे त्याने बुद्धीच्या साहाय्याने निर्भयपणें पुढे,पुढे गेलें पाहिजे आणि बुद्धि जिथपर्यंत नेईल तिथ-पर्यंत जाण्यास तयार असलें पाहिजे. वाटेंत कुठेतरी थांबणें हें त्याच्यापक्षीं योग्य होणार नाही. जेव्हा आपण निषेध करूं लागतों तेव्हा आपण सगळ्याच गोष्टींचा निषेध केला पाहिजे, सर्वच गोष्टी बाजूला सारल्या पाहिजेत. मग शेवटीं जें उरेल त्याचा निषेध करतां येणार नाहीं, तें बाजूला सारतां येणार नाही, आणि तोच 'खरा मी' होय. हा 'मी'च विश्वाचा साक्षी आहे; तो अपरिवर्तनीय, नित्य व अनंत आहे. अज्ञानाचीं अनेक पुटें आपल्या डोळ्यांवर चढलीं असल्यामुळे तो सध्याच्या अवस्थेंत आपल्याला दिसत नाही, पण तो सर्वदा आपल्या ठायीं विद्यमान असतोच.

दोन पक्षी एका झाडावर बसले. शेंड्यावर बसलेला पक्षी शांत, भव्य, सदर व निर्दोष असा होता. खालचा पक्षी हा सारखा एका फांदीवरून दुसरीवर उड्या मारीत होता व तो कधी गोड

फळें खाऊन आनंदित होत होता, तर कधी कडू फळें खाऊन दुःखी होत होता. एक दिवस एक फारच कडू फळ खाल्ल्यानंतर त्याने वरील शांत व भव्य अशा पक्ष्याकडे पाहिलें व तो विचार करूं लागला, 'मी त्याच्यासारखा असतों तर किती बरें झालें असतें,' आणि तो उड्या मारीत थोडा त्याच्याजवळ गेला. पण लगेच त्याला वरील पक्ष्यासारखें होण्याच्या इच्छेचें विस्मरण झालें आणि तो पूर्वीप्रमाणेच कडू व गोड फळें खात आणि दुःख व सुख यांचा अनुभव घेत कालक्रमणा करूं लागला. फिरून त्याने एकदा वर पाहिलें आणि फिरून त्या शांत व भव्य पक्ष्याच्या आणखी जवळ तो उडत गेला. असें अनेकदा घडतां घडतां तो त्या वरच्या पक्ष्याच्या अगदी जवळ जाऊन पोहोचला. मग तो त्याच्या पिसाऱ्याच्या तेजाने दिपून गेला आणि त्या तेजांत आपण लीन होत आहोंत असें त्याला वाटलें. आणि अखेर जेव्हा त्याला कळून आलें की तिथे खरोखर एकच पक्षी आहे तेव्हा तो चकित व स्तिमित होऊन गेला. त्याला कळून आलें की तोच सर्वकाळ हा वरचा पक्षी होता.* माणूस हा त्या खालच्या पक्ष्यासारखा आहे. पण सर्वोच्च ध्येय गाठण्यासाठी जर तो सतत प्रयत्न करील तर त्यालाहि कळून येईल की तो स्वतःच आत्मा असून त्याहून वेगळें जें कांही आहे तें सर्व स्वप्नवत् आहे. जडापासून स्वतःला अगदी पृथक् करून घेऊन जडाच्या सत्यत्वावरील विश्वासहि टाकून

---

* द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति ।
समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः ।
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः ॥
— मुंडक उपनिषद् ३,१,१–२

देणें हेंच खरें ज्ञान आहे. ज्ञान्याने ' ॐ तत्सत् ' याचें, म्हणजेच एकमेव सत्यस्वरूप अशा ॐचें सतत चिंतन चालू ठेवलें पाहिजे. अतींद्रिय एकरस एकता हीच ज्ञानयोगाचा पाया आहे. यालाच ' अद्वैतवाद ' म्हणतात. हीच वेदान्ताची कोनशिला आहे; हाच वेदान्ताचा प्रारंभ व शेवट आहे. "ब्रह्म हेंच सत्य असून इतर सर्वकांही असत्य आहे आणि मी ब्रह्म आहें." जोंपर्यंत हें सत्य आपल्या जीवनांत मुरत नाही तोंपर्यंत त्याचा ध्यास करीत राहिलें पाहिजे. याच एका उपायाने आपण सगळ्या द्वैताच्या म्हणजेच चांगलें-वाईट, सुख-दु:ख, आनंद-कष्ट या सगळ्यांच्या पलीकडे जाऊं शकूं आणि आपलें स्वरूप अखंड, अपरिवर्तनीय, अनंत, असीम आणि 'एकमेवाद्वितीय' असें आहे याचा साक्षात्कार करून घेऊं शकूं.

ज्ञानयोगी हा अत्यंत संकुचित मनोवृत्तीच्या एखाद्या संप्रदायवाद्याप्रमाणेच कडवा एकनिष्ठ असावा, पण तो आकाशाप्रमाणे व्यापक आणि उदार मनाचा असावा. त्याला पूर्णपणें मनोनिग्रह करतां आला पाहिजे, त्याच्याठायीं बुद्धांचा किंवा ख्रिस्तांचा अनुयायी होण्याचें सामर्थ्य असलें पाहिजे आणि त्याला स्वेच्छेने स्वत:ला कोणत्याहि धर्मविचारांत विलीन करतां आलें पाहिजे आणि त्याबरोबरच त्या साऱ्यांच्या मुळाशीं असलेल्या शाश्वत समन्वयावरील त्याची निष्ठा अढळ असली पाहिजे. सतत अभ्यासानेच मनावरील हा असला ताबा मिळवितां येतो. सर्व विविधता त्या 'एकमेवाद्वितीया'पासूनच प्रकट झालेली आहे, पण आपण जें काही कर्म करीत असतों त्याच्याशीं एकरूप न होण्याची सवय आपण लावली पाहिजे. ज्या वस्तूचा आपल्या मनाला ध्यास लागला आहे ती सोडून दुसरी कोणतीहि गोष्ट

ऐकणें, पाहणे व बोलणें आपण वर्ज्य केलें पाहिजे. प्राणपणाने व कळकळीने आपण प्रयत्न केला पाहिजे. रात्रंदिवस स्वत:ला सांगा--"मी तो आहें, मी तो आहें--सोऽहं सोऽहम्."

---

# प्रवचन दुसरें

वेदान्ताचे सर्वश्रेष्ठ आचार्य शंकराचार्य हे होत. वेदांमधून निर्दोष तर्काच्या द्वारें त्यांनी वेदान्तांतील सत्यें बाहेर काढलीं व त्यांच्या पायावर त्यांनी आपल्या भाष्यांत विवेचिलेल्या ज्ञानाच्या शास्त्राची इमारत उभी केली. ब्रह्मासंबंधीच्या परस्परविरुद्ध वाटणाऱ्या सर्व वर्णनांची त्यांनी संगति लावून सत्य हें एक व अनंत आहे असें सिद्ध करून दाखविलें. त्यांनी हेंहि दाखवून दिलें की ज्याअर्थी माणूस हळूहळूच अध्यात्ममार्गांत प्रगति करूं शकतो त्याअर्थी त्याच्या योग्यतेनुरूप सत्याचीं त्रिविध वर्णनें आवश्यक आहेत. येशू ख्रिस्तांनी आपल्या शिष्यांच्या योग्यतेनुरूप निरनिराळ्या प्रकारें जी शिकवण दिली ती देखील कांहीशी यासारखीच आहे. प्रथम येशू ख्रिस्तांनी लोकांना शिकविलें की स्वर्गांत त्यांचा पिता वास करीत असून त्याची त्यांनी प्रार्थना करावी. नंतर एक पायरी वर जाऊन ते त्यांना म्हणाले, "मीच द्राक्षाची वेल आहें व तुम्ही तिच्या फांद्या आहांत," आणि शेवटीं त्यांनी सर्वोच्च सत्य त्यांना शिकविलें. ते म्हणाले, "मी आणि माझा पिता एकच आहोंत" आणि 'परमेश्वराचें राज्य तुमच्या हृदयांतच आहे." शंकराचार्यांनी सांगितलें आहे की पुढील तीन गोष्टी ईश्वराच्या कृपेने प्राप्त होतात. (१) मानवी शरीर (२) ईश्वरप्राप्तीची उत्कट इच्छा आणि (३) मार्गदर्शन करणारा गुरु. या तीन देणग्या आपल्याला मिळाल्यास मोक्ष आपल्या जवळच आहे असें समजावयास हरकत नाही. केवळ ज्ञानच आपल्याला मुक्त

करूं शकतें, पण ज्ञानाबरोबर सदाचरणहि आवश्यक आहे.

वेदान्ताचें सार हें आहे की सत्ता एकच असून प्रत्येक जीव पूर्ण सत्ताच आहे, तिचा तो अंश नाही. प्रत्येक दंवबिंदूंत पूर्ण सूर्याचें प्रतिबिंब असतें. ही सत्ता देश, काल व कार्यकारणभाव यांच्यामधून प्रकट झाल्यामुळे ती मानवरूपांत दिसते, पण सर्वत्र दृश्य वस्तूंच्या मागे एकच सत्य विद्यमान आहे. निःस्वार्थ भावाचा अर्थ निकृष्ट किंवा भासमान 'अहं'चा त्याग करणें हा आहे. 'आपण शरीररूप आहोंत' या दुःखमय स्वप्नापासून आपण सुटका करून घेतली पाहिजे. 'मी ब्रह्म आहें' या सत्याचा आपण साक्षात्कार करून घेतला पाहिजे. आपण समुद्रांत पडून त्यांतच विलीन होऊन जाणाऱ्या बिंदूसारखे नाहीं. प्रत्येकजण पूर्ण, अनंत महासागर असून, भ्रमाच्या बंधनांतून मुक्त झाल्याबरोबर हें सत्य त्याला उमगूं लागेल. अनंत हें विभक्त होऊं शकत नाही, जें 'एकमेवाद्वितीय' आहे त्याच्या जोडीला दुसरें कांही असूं शकत नाही. जें कांही आहे तें सर्व तें 'एकमेवाद्वितीय'च आहे. हें ज्ञान सगळ्यांनाच प्राप्त होणार आहे. तरीपण तें आताच प्राप्त करण्यासाठी आपण झटलें पाहिजे, कारण जोंपर्यंत हें ज्ञान आपल्याला प्राप्त होत नाही तोंपर्यंत मानवजातीला आपण सर्वोच्च प्रकारचें साहाय्य करूं शकत नाहीं. जीवन्मुक्त किंवा ज्ञानी व्यक्तिच खरें प्रेम करूं शकतात, खरें औदार्य दाखवूं शकतात व यथार्थ सत्य दाखवून देऊं शकतात, आणि सत्यच आपल्याला मुक्त करूं शकतें वासना आपल्याला दास बनविते. वासना म्हणजे जणुकांही कधीच संतुष्ट न होणारा अत्याचारी दानव असून तो आपल्या सावजांना कधीहि स्वस्थ बसूं देत नाही. पण जीवन्मुक्ताने ज्ञान प्राप्त करून

त्याच्या मदतीने वासनांवर विजय मिळविलेला असतो. ' मी तें एकमेवाद्वितीय आहें' हें कळल्यामुळे त्याला इच्छिण्याजोगें कांहीहि उरत नाही.

मनच आपल्यापुढे शरीर, लिंगभेद, संप्रदाय, जाति, बंधन इत्यादि भ्रम उपस्थित करीत असतें, म्हणून मनाला सत्याचा साक्षात्कार होईपर्यंत त्याला सतत सत्य सांगत राहिलें पाहिजे. आपलें सत्यस्वरूप हें आनंदमय आहे आणि आपल्या अनुभवास येणारीं सर्व सुखें हीं आपल्या सत्य स्वरूपाच्या संस्पर्शाने होणाऱ्या आनंदाचें केवळ प्रतिबिंब किंवा अंशच होत. आपलें सत्यस्वरूप जो आत्मा तो सुखदुःखातीत असून सर्व विश्वाचा तो साक्षी आहे. जीवनाचीं पानें एकानंतर एक ज्याच्यापुढे उलटलीं जातात असा तो अपरिवर्तनशील वाचक आहे.

अभ्यासाने ' योग ' प्राप्त होतो, योगाने ज्ञान प्राप्त होतें, ज्ञानाने प्रेम प्राप्त होतें व प्रेमाने आनंदाचा लाभ होतो. ' मी व माझें ' ही आपली भ्रामक समजूत होय. आपण ती इतका काळ उराशीं बाळगून आहोंत की तिच्यापासून सुटका करून घेणें आपल्याला जवळजवळ अशक्य झालें आहे. तरी पण सर्वोच्च ध्येयाप्रत पोहोचावयाचें असेल तर ही समजूत आपण टाकलीच पाहिजे. आपण प्रसन्न व आनंदी असलें पाहिजे. उदास चेहरा धर्माला पोषक असत नाही. धर्म ही जगांतली अत्यंत आनंद-दायक गोष्ट असली पाहिजे, कारण ती सर्वश्रेष्ठ आहे देहदंडाने आपण पवित्र होऊं शकत नाहीं. जो माणूस ईश्वरावर प्रेम करतो व शुद्ध असतो त्याने दुःखी कां व्हावें ! त्यानें एखाद्या आनंदी बालकासारखें--ईश्वराच्या खऱ्याखुऱ्या बालकासारखें असलें पाहिजे. हृदय शुद्ध करणें हें धर्माचें सार आहे. ईश्वराचें

राज्य आपल्या हृदयांतच आहे. पण शुद्धहृदयी लोकच ईश्वराचें दर्शन घेऊं शकतात. आपण जगाचाच विचार करतों म्हणून जग हें आपल्याला जगच दिसतें. पण जग हें ईश्वरच आहे अशा बोधानें आपण त्याच्याकडे पाहूं लागलों की आपल्याला त्यांत ईश्वराचेंच दर्शन घडूं लागेल. सगळ्या वस्तु व व्यक्ति-आईबाप, मुलें, पति, पत्नी, मित्र, शत्रु--या सगळ्यांविषयी हा ईश्वरबोधच आपल्या मनांत असला पाहिजे, सर्व विश्व जाणीवपूर्वक ईश्वराच्या भावनेनें भरून टाकलें तर त्याचें स्वरूप कसें पार बदलून जाईल याचा विचार तर करून पाहा! विश्वांत ईश्वराव्यतिरिक्त दुसरें कांही पाहूं नका, मग सर्व दुःखें, सगळे संघर्ष व सर्व कष्ट हीं सारीं आपल्यापुढून कायमचीं नाहीशीं होऊन जातील.

ज्ञान म्हणजे असांप्रदायिकता होय, पण त्याचा अर्थ असा नव्हे की तें संप्रदायाचा तिरस्कार करतें. त्याचा अर्थ हा की सर्व संप्रदायांपेक्षा श्रेष्ठ व त्यांच्या पलीकडची अवस्था ज्ञान्याला प्राप्त झाली आहे. ज्ञानी कांहीहि नष्ट करूं इच्छीत नाही, तो सगळ्यांना मदत करूं इच्छितो. ज्याप्रमाणे सर्व नद्यांचें पाणी समुद्रांत पडून समुद्राशीं एकरूप होऊन जातें त्याचप्रमाणे सर्व संप्रदाय ज्ञानांत परिणत होऊन तद्रूप होऊन गेले पाहिजेत.

सर्व वस्तूंचें अस्तित्व ब्रह्मावर अवलंबून आहे, आणि हें सत्य आपण खऱ्या अर्थानें जितकें आकळूं शकूं तितकें आपल्याला खरें अस्तित्व लाभत जाईल. जेव्हा आपली भेददृष्टि पूर्णपणें नाहीशी होईल तेव्हाच 'मी आणि माझा पिता एकच आहोंत' या सत्याचें आपल्याला ज्ञान होईल

भगवद्‌गीतेंत भगवान कृष्णांनी ज्ञानाचा सुस्पष्ट उपदेश

केला आहे. हें महान् काव्य भारतीय वाङमयाचा मुकुटमणि समजलें जातें. तें वेदावरील एकप्रकारचें भाष्य आहे. गीता आपल्याला शिकविते की आध्यात्मिकता प्राप्त करून घेण्यासाठी या जीवनांतच आपल्याला लढा दिला पाहिजे. म्हणून जीवनापासून आपण पळ काढतां कामा नये. उलट त्याच्यापासून जें कांही मिळवितां येईल तें मिळविण्यासाठी झटलें पाहिजे. उच्च गोष्टींच्या लाभासाठी केल्या जाणाऱ्या संघर्षाचें गीता हें प्रतीक असल्यामुळे ती युद्धक्षेत्रावर सांगितली गेली ही घटनाच मोठी काव्यात्मक आहे. एका पक्षाचा नेता जो अर्जुन त्याचें सारथ्य करीत असलेले श्रीकृष्ण त्याला दुःखी न होण्याचा, मृत्यूला न भिण्याचा उपदेश करतात. याचें कारण हें की, आत्मा अमर आहे व जें कांही परिवर्तनशील आहे तें मानवाचें खरें स्वरूप असूं शकत नाही हे त्यांना माहीत होतें. एकामागून एक अशा अनेक अध्यायांत श्रीकृष्ण अर्जुनाला तत्त्वज्ञान व धर्म यांमधील उच्च सत्यांचा उपदेश करतात. ह्या उपदेशांमुळेच हें काव्य इतकें सुंदर बनलें आहे. वेदान्ताचें प्राय: समग्र तत्त्वज्ञानच त्यांत समाविष्ट झालें आहे. वेद सांगतात की आत्मा अनंत असून शरीराच्या मृत्यूचा त्याच्यावर कांहीहि परिणाम होत नाही. आत्मा असें एक वर्तुळ आहे की ज्याला परिघ नाही, पण ज्याचा मध्यबिंदु कोणत्या ना कोणत्या शरीरांत असतो. मृत्यु--तथाकथित मृत्यु--म्हणजे केवळ या मध्यबिंदूचें स्थानान्तर होय. ईश्वर हें असें एक वर्तुळ आहे की ज्याचा परिघ कोठेहि नाही, पण ज्याचा मध्यबिंदु सर्वत्र आहे; आणि जेव्हा आपण सीमित देहाच्या मध्यबिंदूतून बाहेर पडूं तेव्हा आपल्याला ईश्वराचा, म्हणजे आपल्या खऱ्या स्वरूपाचा साक्षात्कार होईल.

वर्तमानकाळ हा भूतकाळ व भविष्यकाळ यांमधील केवळ विभाजक रेषाच आहे. म्हणून 'आम्ही वर्तमानकाळाचीच पर्वा करतों' असें म्हणणें तर्कसंगत नाही, कारण वर्तमानकाळाला भूतकाळ व भविष्यकाळ यांहून निराळें अस्तित्वच नाही. हे तिन्ही मिळून एक पूर्ण वस्तु आहे. काळाची कल्पना म्हणजे आपल्या आकलनपद्धतीने आपल्यावर लादलेलें एक बंधन आहे.

अनुक्रम ... नोंद दि. ...

# प्रवचन तिसरें

ज्ञानयोगाची शिकवण ही आहे की आपण जगाचा त्याग करावयास हवा. पण 'जग सोडून बाहेर जावें' असा त्याचा अर्थ नाही. 'जगांत राहून जगाचें न होणें' हीच संन्याशाची खरी कसोटी आहे. संन्यासाची ही कल्पना प्राय: सगळ्याच धर्मांत कोणत्या ना कोणत्या रूपांत आढळते. ज्ञानयोगाची ही अपेक्षा आहे की आपण सर्वांना सारखें लेखावें, सर्वत्र 'साम्यबुद्धि' बाळगावी. निंदा-स्तुति, चांगलें-वाईट, शीत-उष्ण ही सर्व आपल्याला समान वाटावयास हवीत. भारतांत असे अनेक साधु आहेत की ज्यांच्या ठायीं ही साम्यबुद्धि आपल्याला अक्षरश: दिसून येते. ते हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांवर किंवा तापलेल्या वाळवंटांत अंगांत मुळीच कपडे न घालतां भ्रमण करीत असतात. थंडी आणि उष्णता यांतील भेद त्यांना मुळीच जाणवत नाही असें वाटतें.

सर्वप्रथम 'मी देह आहें' ही भ्रामक समजूत आपण टाकली पाहिजे. आपण देह नाहीं. यानंतर, 'मी मन आहें' हा भ्रम टाकून देणें आवश्यक आहे. आपण मन नाहीं. मन हें रेशमासारखें सूक्ष्म शरीर आहे. तें आत्म्याचा अंश नाही. सर्वच पदार्थांना लावला जाणारा 'देह' हा शब्द सर्व देहांना समान असणाऱ्या एका तत्त्वासाठी वापरण्यांत येत असतो. हें तत्त्व म्हणजेच अस्तित्व होय. आपलीं शरीरें म्हणजे त्यांच्यामागील विचारांचीं प्रतीकें होत. आणि हे विचार देखील त्यांच्यामागील आणखी कशाचें तरी प्रतीक होत. हें 'कांहीतरी' म्हणजेच ती एक-

मेव यथार्थ सत्ता होय; ही सत्ताच आपल्या आत्म्याचा आत्मा, विश्वाचा आत्मा, आपल्या प्राणाचा प्राण असून तेंच आपलें खरें स्वरूप होय. जोंपर्यंत आपण स्वत:ला ईश्वराहून यत्किंचित्हि वेगळे समजूं तोंपर्यंत आपल्या ठायीं भय राहील.* पण आपणच तें एकमेव तत्त्व आहोंत या सत्याचा साक्षात्कार होतांच भय निघून जाईल. मग आपण कशाला भिणार ? केवळ इच्छा-शक्तीच्या बळावर ज्ञानी हा शरीराच्या व मनाच्या पलीकडे जातो आणि तो हें विश्व शून्यवत् करून टाकतो. अशा प्रकारें अविद्येचा नाश करून तो आपल्या सत्य स्वरूपाला--आत्म्याला --ओळखतो. सुखदु:खाचा अनुभव इंद्रियांनाच येतो; आपल्या खऱ्या स्वरूपाला त्यांचा स्पर्श होत नाही. आत्मा हा देश-काल-कार्यकारणभाव यांच्या पलीकडे आहे आणि म्हणून तो असीम व सर्वव्यापी आहे.

ज्ञान्याने सर्व विधि-अनुष्ठानांतून बाहेर पडलें पाहिजे, सर्व नियम व पंथ यांच्या पलीकडे गेलें पाहिजे व स्वत:च स्वत:चा ग्रंथ झालें पाहिजे. निरनिराळ्या विधि-अनुष्ठानांनी जखडले जाऊन आपण जड बनतों व नंतर आपला मृत्यु ओढवतो. तरी पण जे लोक सध्या विधि-अनुष्ठानांच्या पलीकडे जाऊं शकत नाहीत त्यांची ज्ञान्याने निंदा करूं नये. इतरांविषयी त्याने हा विचार कधीच मनांत आणूं नये की 'मी तुझ्याहून अधिक पवित्र आहें.'

खऱ्या ज्ञानयोग्याचीं लक्षणें पुढीलप्रमाणे आहेत--(१) ज्ञानाशिवाय त्याला दुसऱ्या कशाचीहि इच्छा नसते. (२) त्याचीं

* यदा ह्येवैष एतस्मिन्नुदरमन्तरं कुरुते ।
अथ तस्य भयं भवति ।। --तैतिरीय उपनिषद् २, ६

सर्व इंद्रियें त्याच्या पूर्णपणें ताब्यांत असतात. कुरकुर न करता सर्व गोष्टी तो सहन करीत असतो. उघड्या फरशीवर आकाशाखाली झोपावें लागलें काय किंवा एखाद्या राज्याच्या महालांत झोपण्यास मिळालें काय, त्याला दोन्ही सारखेंच असतें. तो दुःख टाळीत नाही, तो तें शांतपणें सहन करतो. आत्म्याशिवाय सर्व गोष्टींचा त्याने त्याग केलेला असतो. (३) त्या 'एका'ला सोडून बाकी सर्व असत्य होय हें त्याला कळलेलें असतें. (४) त्याला मुक्तीची उत्कट इच्छा असते, दृढ इच्छाशक्तीने आपलें मन तो उच्च गोष्टींवर केंद्रित करतो व त्यायोगें त्याला शांति लाभते. जर आपल्याला शांति लाभली नाही तर पशूंहून आपण वेगळे कसे ठरणार ? इहलोकांत किंवा परलोकांत फलाची इच्छा न धरतां व सर्व कर्मफलांचा त्याग करून, तो सर्व कर्में इतरांसाठी--ईश्वरासाठी--करतो. आत्म्याहून श्रेष्ठ असें या विश्वापासून आपल्याला काय मिळूं शकतें ? आत्मप्राप्ति झाली की सर्वकांही मिळालें. वेदांचें सांगणें आहे की आत्मा म्हणजें एक अखंड सत्ता आहे. तो मन, स्मृति, विचार यांच्या इतकेंच काय पण सामान्य जाणिवेच्याहि पलीकडे आहे. त्यापासूनच सर्वकांही उत्पन्न होतें. त्याच्यामुळे किंवा त्याच्यामधून आपण सर्वकांही पाहतों, ऐकतों, अनुभवतों, विचार करतों. विश्वाचें अंतिम लक्ष्य ओंकाराशीं किंवा त्या एकमेव सत्तेशीं ऐक्य प्राप्त करणें हेंच आहे. ज्ञानी सर्व धर्ममतांपासून मुक्त असला पाहिजे. तो हिंदु, बौद्ध, किंवा ख्रिस्ती कांहीच नसतो, पण तो हे तिन्ही असतो. सर्व कर्मांचा त्याने त्याग केलेला असतो, तीं त्याने ईश्वराला अर्पिलेलीं असतात, म्हणून कोणतेंहि कर्म त्याला बंधनकारक होऊं शकत नाही. ज्ञानी हा अत्यंत

बुद्धिवादी असतो. तो सर्वकांही नाकारतो. तो रात्रंदिवस स्वत:ला सांगत असतो, "सर्व श्रद्धा, सर्व मंत्र, स्वर्ग, नरक, संप्रदाय, प्रार्थनागृहें हीं खोटीं आहेत. आत्माच फक्त सत्य आहे." सर्वकांही नाकारल्यानंतर न नाकारण्याजोगें जें उरतें तोच आत्मा होय. ज्ञानी कोणतीहि गोष्ट गृहीत धरत नाही; तो शुद्ध बुद्धि व इच्छाशक्ति यांच्या साहाय्याने विश्लेषण करीत करीत सर्व सापेक्ष भावांच्या पलीकडे जाऊन निर्वाणाप्रत पोहोचतो. या अवस्थेचें वर्णन किंवा कल्पनाहि करतां येत नाहीं. कोणत्याहि पार्थिव परिणामावरून ज्ञानाचें मूल्य जोखणें योग्य नाही. गिधाड खूप उंच--अगदी दृष्टीच्या पलीकडे--उडत जाऊनहि कुजत असलेलें मढें दिसतांच त्यावर झडप घालण्यास जसें टपलेलें असतें तसे होऊं नका. दीर्घायुष्य, आरोग्य, समृद्धि यांची इच्छा बाळगूं नका. फक्त मुक्त होण्याची इच्छा धरा.

आपण सच्चिदानंदस्वरूप आहोंत. सत् किंवा अस्तित्व हें विश्वांतील अंतिम सामान्यीकरण आहे. म्हणून आपण 'सत्' आहोंत व आपण तें जाणतों. आनंद हा अमिश्र वा केवल अस्तित्वाचा स्वाभाविक परिणाम होय. कधी कधी परमानंदाचा आपल्याला क्षणैक अनुभव येतो. तेव्हा आपल्याला आनंदाव्यतिरिक्त दुसऱ्या कशाचीहि अपेक्षा नसते, आपण दुसरें कांही देत नाहीं व दुसरें कांही जाणत नाहीं. पण नंतर आनंदाचा हा क्षण निघून गेल्यावर आपल्या समोर विश्वाचा हा देखावा पुन: उभा राहतो, पण तेव्हा आपल्याला कळून येतें की "सर्व जगाची पार्श्वभूमि असलेल्या ईश्वराच्या आधारावर ही जगद्रूपी कारागिरी निर्मिलेली आहे." जडसृष्टींत परत येऊन निरपेक्ष सत्य जेव्हा आपण सापेक्ष रूपांत पाहूं लागतों तेव्हा सच्चिदानंद

हें पिता, पुत्र व पवित्र आत्मा या त्रयीच्या रूपांत दिसूं लागतें. सत् म्हणजें सृजन करणारें तत्त्व, चित् म्हणजे परिचालन करणारें तत्त्व, आणि आनंद म्हणजे आत्मानूभूति करून देणारें तत्त्व; हेंच तत्त्व आपल्याला पुन: त्या एकमेव आत्म्याशीं संयुक्त करतें. ज्ञानाशिवाय वा 'चित्'शिवाय अस्तित्वाचा वा 'सत्'चा अनुभव कोणी प्राप्त करूं शकत नाही. हेंच येशू ख्रिस्तांच्या "पुत्रामधून पाहिल्याशिवाय पित्याचें कोणी दर्शन घेऊं शकत नाही" या कथनाचें मर्म आहे. वेदान्त सांगतो की इहलोकांत व याच जन्मांत निर्वाणाची प्राप्ति होऊं शकते, त्यासाठी मृत्यूची वाट पाहण्याची आवश्यकता नाही. निर्वाण म्हणजे आत्मसाक्षात्कार होय आणि एकदाच, एका क्षणापुरतेंच का होईना, आत्म्याचें दर्शन घडलें की क्षुद्र 'अहं'च्या भ्रमांत आपण पडूं शकत नाहीं. डोळे असेपर्यंत दृश्य वस्तु दिसणारच. पण त्यांचें खरें स्वरूप आपल्याला माहीत झालेलें असल्यामुळे आपण भ्रान्त होत नाहीं. हें दृश्यमान जगत् म्हणजे अपरिवर्तनीय अशा आत्म्याला झाकणारें आवरण होय. हें आवरण बाजूला झालें की त्यामागील आत्म्याचें आपल्याला दर्शन होतें. सर्व बदल आवरणांतच घडून येत असतो. सत्पुरुषाच्या बाबतींत हें आवरण अगदी झिरझिरीत असून त्यांतून सद्वस्तूचा प्रकाश प्राय: पूर्णपणें प्रकट होतो, पण पापी लोकांच्या बाबतींत हें आवरण फार जाड असतें. आणि त्यामुळे सत्पुरुषांत जो आत्मा आहे तोच पाप्यांतहि आहे या सत्याचा आपल्याला विसर पडणें सहज शक्य असते.

एकत्वाचा शोध लागला म्हणजे सर्व तर्कविचारांचा शेवट

होतो म्हणून प्रथम आपण विश्लेषण करून नंतर संश्लेषणाकडे वळतों. विज्ञानाच्या क्षेत्रांत विश्वव्यापी अशा एका शक्तीचा शोध लावण्यासाठी विविध शक्तींचें क्रमश: एकीकरण केलें जातें. अंतिम एकत्वाचें भौतिक शास्त्राला जेव्हा पूर्णपणें आकलन होईल तेव्हा त्या शास्त्राची समाप्ति होईल, तें आपल्या अंतिम ध्येयाप्रत पोहोचेल, कारण एकत्वाप्रत पोहोचल्यावर आपला शोध संपतो. आत्मज्ञान हीच अंतिम अवस्था होय.

सर्व शास्त्रांमध्ये श्रेष्ठ असें शास्त्र जो धर्म, त्याने फार प्राचीन काळींच त्या अंतिम एकत्वाचा शोध लावला होता. या एकत्वाची प्राप्ति करणें हेंच ज्ञानयोगाचें उद्दिष्ट आहे. विश्वांत एकच आत्मा विद्यमान आहे. निरनिराळे जीव त्याचींच अभिव्यक्त रूपें होत, पण आत्मा या सर्व रूपांहून अधिक व्यापक आहे. सर्वकांही आत्मा किंवा ब्रह्मच आहे. सत्पुरुष, पापी, कोकरूं, वाघ, इतकेंच नव्हे तर खुनी माणूस देखील, त्यामधील सत्तेच्या दृष्ट ने पाहिल्यास ब्रह्माव्यतिरिक्त अन्य कांही नाही; कारण, ब्रह्माव्यतिरिक्त अन्य कांही अस्तित्वांतच नाही "**एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति**"—"सद्वस्तु एकच आहे, ज्ञानी लोक तिचा विविध नांवांनी निर्देश करतात." या ज्ञानाहून श्रेष्ठ असें कांहीच असूं शकत नाही. आणि जे योगाने शुद्ध झाले आहेत त्यांच्या हृदयांत हें ज्ञान विजेप्रमाणे उद्भासित होतें. योगाच्या आणि ध्यानाच्या द्वारें एखादी व्यक्ति जितकी अधिक शुद्ध व योग्य झाली असेल तितकाच तिच्या हृदयांत प्रकट होणाऱ्या ज्ञानाचा प्रकाश अधिक स्पष्ट असतो. या ज्ञानाचा शोध चार हजार वर्षांपूर्वीच लागला होता, पण अजून तें सर्व लोकांना प्राप्त झालेलें नाही; कांही व्यक्तींनाच त्याचा लाभ झाला आहे.

---

# प्रवचन चवथें

ज्यांना आपण 'मानव' म्हणतों ते सगळे, खरें पाहतां, अजून मानव नाहीत. प्रत्येकाला आपापल्या बुद्धीने जगाचें स्वरूप ठरवावें लागतें. जगासंबंधीचें उच्च ज्ञान ही फार कठीण गोष्ट आहे. अनेकांना सूक्ष्म तत्त्वापेक्षा स्थूल भौतिक वस्तुच जास्त खऱ्या वाटत असतात. याचें उदाहरण म्हणून मुंबईतील एक हिंदु व एक जैन अशा दोन माणसांची गोष्ट सांगतात. हे दोघेजण मुंबईतील एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या घरीं बुद्धिबळ खेळत होते. हें घर समुद्राच्या कांठीं होतें. खेळ बराच वेळ चालू होता. समोर दिसणाऱ्या समुद्राच्या भरतीओहोटीच्या दृश्याने ते खेळाडू आकृष्ट झाले. त्यांच्यापैकी एकाने या दृश्याचें, एक कथा सांगून स्पष्टीकरण केलें. तो म्हणाला, "देव हे एका खड्ड्यांत पाणी ओतण्याचा व फिरून तें त्यांतून काढून टाकण्याचा खेळ खेळत आहेत." दुसरा म्हणाला, "नाही. देव तें पाणी ओढून एका डोंगराच्या शिखरावर नेतात व काम झाल्यानंतर तें पुन: खाली ओतून देतात." तिथे असलेला एक तरुण विद्यार्थी त्यांचें हें बोलणें ऐकून हसला आणि म्हणाला, "तुम्हांला माहीत नाहीं काय की चंद्राच्या आकर्षणानेच समुद्राला भरती येते?" तें ऐकून ते दोघेहि त्या तरुणावर फार रागावले आणि त्याला म्हणाले, "तूं काय आम्हांला मूर्ख समजतोस? चंद्राजवळ समुद्राचें पाणी ओढून नेण्यासाठी दोर आहे व तो खूप लांब आहे यावर आम्ही विश्वास ठेवूं असें तुला वाटतें काय? असें कोणतेंहि मूर्खपणाचें स्पष्टीकरण खरें मानावयास आम्ही तयार

नाहीं." त्याच वेळीं घराचा मालक खोलींत आला व दोन्ही पक्षांनी निर्णय देण्याची त्याला विनंती केली. तो सुशिक्षित असून त्याला अर्थातच सत्य माहीत होतें. पण त्या खेळाडूंच्या गळीं सत्य उतरविणें अशक्य आहे असें वाटल्यामुळे घरमालकाने त्या तरुण विद्यार्थ्याला खुणावलें व भरतीओहोटीचें असें स्पष्टीकरण दिलें की जें त्या मूर्ख खेळाडूंना पूर्णपणें पटलें. तो त्यांना म्हणाला. "तुम्हांला ठाऊकच असेल की समुद्राच्या मध्य-भागीं स्पंजाचा एक डोंगर आहे तुम्हीं दोघांनी स्पंज पाहिलाच आहे. म्हणून मी काय सांगतों तें तुम्हांला कळतच असेल. हा स्पंजाचा डोंगर समुद्राचें बरेचसें पाणी शोषून घेतो, त्यामुळे समुद्राला ओहोटी येते. नंतर हळूहळू देव या डोंगरावर नाचण्या-साठी उतरतात. त्यांच्या भारामुळे हा डोंगर पिळला जाऊन त्यांतील सगळें पाणी बाहेर पडतें आणि मग समुद्राला भरती येते. मित्रांनो! हेंच भरतीओहोटीचें कारण आहे. हें स्पष्टी-करण किती तर्कसंगत व साधें आहे हें तुम्ही स्वतःच समजूं शकतां." चंद्राच्या आकर्षणशक्तीच्या कल्पनेची टिंगल उड-विणाऱ्या त्या दोन्ही गृहस्थांना स्पंजाच्या डोंगराच्या कल्पनेंत व त्यावरील देवांच्या नृत्यांच्या कल्पनेंत कांहीहि अविश्वसनीय वाटलें नाही! त्यांच्या दृष्टीने देव खरे होते व स्पंज त्यांनी स्वतः पाहिला होता. म्हणून या दोघांचा संयुक्त परिणाम समुद्रावर व्हावा याहून अधिक संभवनीय काय असूं शकतें!

आराम ही सत्याची कसोटी नव्हे. उलट सत्य हें पुष्कळदा त्रासदायक असतें. जर खरोखरीच सत्य जाणून घ्यायची उत्कंठा असेल तर आरामाचा हव्यास सोडला पाहिज. सर्वकांही सोडून देणें फार कठीण आहे, पण ज्ञान्याने तें करावयास तयार झालेंच

पाहिजे. त्याने पवित्र झालें पाहिजे, सर्व इच्छा टाकल्या पाहिजेत व देहात्मबुद्धीचा त्याग केला पाहिजे तेव्हाच त्याच्या हृदयांत उच्च सत्य उद्भासित होईल. त्याग हा आवश्यक आहे. क्षुद्र 'अहं'चें बलिदान हेंच यज्ञामागील तत्त्व असल्यामुळे यज्ञसंस्था ही सर्व धर्माचें एक अंग बनली आहे. देवांना संतुष्ट करण्यासाठी पूर्वीच्या काळीं केले जाणारे यज्ञयाग हे म्हणजे भासमान ' अहं 'च्या त्यागाचींच अस्पष्ट प्रतीकें होतीं. या भासमान ' अहं च्या त्यागानेच आत्म्याचा साक्षात्कार होऊं शकतो. ज्ञान्याने शरीररक्षणासाठी धडपड करूं नये किंवा शरीररक्षणाची इच्छाहि बाळगूं नये. संपूर्ण विश्व नष्ट होणार असलें तरी त्याने दृढपणें सत्याचें अनुसरण केलें पाहिजे. जें लोक अल्पकाळ टिकणाऱ्या छंदांच्या मागे लागतात ते असें करूं शकत नाहीत. हें संपूर्ण जीवनाचें, नव्हे अनेक जन्मांचें कार्य आहे! फारच थोडे लोक स्वर्ग, सगुण ईश्वर, फल कांक्षा यांचा त्याग करून अंत स्थ ईश्वराचा साक्षात्कार करून घेण्याचें धाडस करतात. यासाठी अत्यंत दृढ इच्छाशक्ति अपेक्षित आहे. संदेहामुळे डळमळणें हें अत्यंत दौर्बल्याचें लक्षण आहे. माणूस हा नेहमी पूर्णच आहे, तसें नसतें तर तो कधी पूर्ण होऊंच शकला नसता पण ह्या पूर्णत्वाचा त्याला साक्षात्कार झाला पाहिजे. जर बाह्य कारणांनी माणून बद्ध असेल तर तो मर्त्यच ठरेल. जें सर्व बंधनांच्या पलीकडे आहे, जें मर्यादातीत आहे तेंच अमर असूं शकतें. आत्म्यावर कशाचाच परिणाम होऊं शकत नाही. अशा परिणामाची कल्पना हा केवळ भ्रम होय. पण माणसाने आत्म्याशीं एकरूप झालें पाहिजे, शरीराशीं किंवा मनाशीं नव्हे. 'मी विश्वाचा साक्षी आहें' असें त्याने जाणावें,

मगच तो या दृश्य जगताचें अद्‌भुत सौंदर्य अनुभवूं शकेल. 'मी विश्व आहें, मी ब्रह्म आहें' असें त्याने स्वतःला सांगावें. त्या एकमेव आत्म्याशीं मानव जेव्हा खरोखर एकत्व प्राप्त करतो तेव्हा त्याला सर्वकांही करणें शक्य होतें, सर्व जडविश्व त्याचा दास होऊन जातें. श्रीरामकृष्ण म्हणत, "ताक घुसळून लोणी काढल्यावर तें पाण्यांत किंवा दुधांत टाकलें तरी त्यांत ते मिसळत नाही. तसेंच आत्मज्ञान झाल्यावर माणूस जगांत राहूनहि जगाने दूषित होत नाही."

"'बलून'मधे बसून खाली पाहूं लागल्यास क्षुद्र भेद दृष्टि-गोचर होत नाहीत. तद्वतत्र माणूस जेव्हा बऱ्याच उच्च पातळीवर जाईल तेव्हा त्याला चांगला व वाईट हा भेद दिसून येणार नाही." एकदा मडकें भाजून पक्कें झालें की त्याला फिरून नवा आकार देतां येत नाही. तद्वतच ज्या मनाला ईश्वराचा स्पर्श एकदा घडला आहे व जें मन साधनेच्या अग्नींतून भाजून निघालें आहे तें बदलणें शक्य नाही." तत्त्वज्ञानाला सस्कृतांत 'दर्शन' असें म्हणतात. या शब्दाचा अर्थ 'सम्यक् दृष्टि' असा आहे आणि धर्म हें दर्शनाचेंच व्यवहार्य स्वरूप होय. केवळ तात्त्विक व सैद्धान्तिक तत्त्वज्ञानाला भारतांत फारसें महत्त्व दिलें जात नाही. तिथे कोणतेंहि 'चर्च' वा ठराविक असें धर्ममत नाही. तेथील दोन महत्त्वाचे संप्रदाय 'द्वैत' व 'अद्वैत' हे होत. द्वैत संप्रदायांचें सांगणें आहे की, "मोक्षाची प्राप्ति ईश्वरकृपेने होते. कार्यकारणभावाची परंपरा एकदा चालू झाली की ती कधी तोडली जाऊं शकत नाही. या कार्यकारणाच्या बंधनाने बद्ध नसलेल्या ईश्वराच्या कृपेनेच आपली त्यांतून सुटका होऊं शकते." अद्वैती म्हणतात, "या सर्व प्रकृतीच्या मागे एक स्वाधीन असें तत्त्व आहे. या सर्वनियमातीत व सर्वबंधनातीत

तत्त्वाच्या प्राप्तीनेच माणूस स्वतंत्र होतो. आणि ही स्व-तंत्रताच मुक्ति होय." द्वैत ही केवळ एक अवस्था आहे; अद्वैत हेंच अंतिम तत्त्व आहे. शुद्ध होणें हा मुक्तीचा सगळ्यांत जवळचा मार्ग आहे. जें आपण स्वत: मिळवितों तेंच आपलें असतें कोणतेंहि शास्त्रप्रमाण किंवा कोणत्याहि धर्मावरील विश्वास आपला उद्धार करूं शकत नाही. जर ईश्वर असेल तर सगळ्यांनाच तो प्राप्त होऊं शकतो. आता उकाडा होत आहे हें कुणालाहि सांगण्याची आवश्यकता नसते. प्रत्येकालाच त्याचा अनुभव येऊं शकतो. हीच गोष्ट ईश्वरालाहि लागू आहे. सर्व लोकांना त्याचें प्रत्यक्ष ज्ञान होऊं शकतें पाश्चात्यांची पापाविषयी जी कल्पना आहे त्या अर्थानें हिंदु लोक 'पापा'चें अस्तित्व मानीत नाहीत. दुष्कर्म हें 'पाप' नाही, म्हणजे दुष्कर्म केल्याने आपण कोणा शासकाला--ईश्वराला--नाराज करीत नाहीं, पण दुष्कर्म केल्याने आपण आपलेंच नुकसान करून घेतों आणि त्याचे वाईट परिणाम आपल्यालाच भोगावे लागतात. विस्तवांत बोट घालणें हें कांही पाप नाही, पण जो तसें करील त्याला पाप केल्यासारखेंच दु:ख भोगावें लागेल, एवढें मात्र खरें. सर्व कर्मांचा कांही ना कांही परिणाम होतोच आणि 'तें कर्त्याकडे परत येतेंच.' त्रितत्ववाद हा एकत्ववादापेक्षा श्रेष्ठ आहे. एकत्ववाद हें द्वैतमत आहे. या एकत्ववादानुसार ईश्वर आणि मनुष्य हे नित्य पृथक् आहेत. आपण ईश्वराचीं लेकरें आहोंत हें जाणणें ही उन्नतीची पहिली पायरी आहे व आपण तो एकमेव आत्मा आहोंत हें जाणणें ही शेवटची पायरी आहे.

# प्रवचन पाचवें

शरीर हें शाश्वत कां असूं शकत नाही हा प्रश्नच तर्काशीं विसंगत आहे. कारण कांही घटकांच्या परिवर्तनशील व स्वभावतःच अनित्य अशा संघाताला 'शरीर' हें नांव दिलें आहे. जेव्हा आपण परिवर्तनांमधून जाणार नाहीं तेव्हा आपलें हें तथाकथित शरीर राहणार नाही. स्थल, काल व कार्यकारण-भाव यांच्या मर्यादेपलीकडील द्रव्य हें जडद्रव्यच असूं शकत नाही. स्थल व काल हीं आपल्या आंतच असतात. आपण ती शाश्वत अद्वितीय सत्ता आहोंत. सर्व रूपें वा आकार क्षणभंगुर आहेत, म्हणूनच सर्व धर्म सांगतात की 'ईश्वर निराकार आहे.' मिनँडर हा ग्रीकोबॅक्ट्रियन राजा होता. एका बौद्ध भिक्षु प्रचारकाने सुमारें ख्रिस्तपूर्व १५० सालीं मिनँडरला बौद्धधर्माची दीक्षा देऊन त्याला 'मिलिन्द' हें नांव दिलें. मिलिन्दाने आपल्या गुरूला –त्या तरुण भिक्षूला विचारलें, "बुद्धांसारखा पूर्णत्व पावलेला महापुरुष चुका करूं शकतो काय किंवा तो भ्रमांत पडूं शकतो काय !" तरुण भिक्षूने यावर उत्तर दिलें की पूर्णत्वास पोहोचलेल्या महापुरुषाला त्याच्या अनुभवाच्या कक्षेंत न आलेल्या क्षुद्र गोष्टींविषयी अज्ञान असूं शकतें, पण त्याने अंतर्दृष्टीने प्रत्यक्ष अनुभवलेल्या गोष्टीसंबंधी तो कधीच भ्रमांत पडूं शकत नाही. तो याच शरीरांत, याच जगांत पूर्णत्व पावलेला असतो. तो विश्वाचें संपूर्ण रहस्य व त्याचें सारतत्त्व जाणतो, पण त्याला कदाचित या तत्त्वाची स्थलकालांमधे अभिव्यक्त

होणारीं विविध बाह्य रूपें माहीत नसतीलहि. माती काय आहे हें त्याला माहीत असतें, पण तिच्यापासून विविध आकारांच्या ज्या वस्तु तयार होऊं शकतात त्या सर्वांची माहिती त्याला कदाचित् नसेलहि. पूर्णत्व पावलेल्या महापुरुषाला आत्म्याचें ज्ञान असतें, पण आत्म्याचीं निरनिराळीं अभिव्यक्त रूपें त्याला अज्ञात असूं शकतात. आपल्याचप्रमाणे त्यालाहि अधिक सापेक्ष ज्ञान प्राप्त करून घ्यावें लागेल, पण अर्थातच त्याच्या प्रचंड सामर्थ्यामुळे हें ज्ञान तो अत्यंत शीघ्रतेने प्राप्त करून घेऊ शकतो.

पूर्णपणें संयमित अशा मनाचा प्रखर प्रकाश जेव्हा कोण-त्याहि विषयावर पडतो तेव्हा त्याच्यामुळे फारच शीघ्रतेने तो विषय आत्मसात् होऊन जातो. ही गोष्ट समजून घेणें फारच महत्त्वाचें आहे, कारण त्यामुळे बुद्ध किंवा ख्रिस्त यांसारखे महापुरुष सामान्य सापेक्ष गोष्टींच्या बाबतींत कसे अज्ञ राहूं शकतात या प्रश्नाचा उलगडा होतो आणि अशा गोष्टींचीं जीं मूर्खतापूर्ण स्पष्टीकरणें दिलीं जातात त्यांची गरज उरत नाही. या महापुरुषांना कांही सामान्य गोष्टी अज्ञात होत्या हें आपण जाणतों, या महापुरुषांचे उपदेश त्यांच्या शिष्यांनी चुकीचे उतरवून घेतले असें म्हणून या शिष्यांना दोष देणें उचित नाही. शिष्यांनी उतरवून घेतलेल्या उपदेशांतील कांही गोष्टी खऱ्या आहेत व इतर खोटया आहेत असें म्हणणें ढोंगीपणाचें आहे. या शिष्यांनी केलेलें सगळेंच वर्णन स्वीकारा, नाहीतर सगळेंच टाकून द्या; आपण त्यांतून असत्य वगळून सत्य कसें वेचून काढणार ?

जर एखादी गोष्ट एकदा घडली असेल तर ती पुन: घडूं

शकतें. जर एखाद्या मानवाने कधी पूर्णत्व प्राप्त केलें असेल तर आपणहि तें प्राप्त करूं शकतों. जर या जन्मांत व याच जगांत आपण पूर्ण होऊं शकत नसलों तर आपण कल्पिलेल्या कोणत्याहि अवस्थेंत किंवा कोणत्याहि लोकांत आपण कधीहि पूर्ण होऊं शकत नाहीं. जर येशू ख्रिस्त पूर्ण नसतील तर त्यांच्या नांवाने चालणारा धर्म निरर्थक ठरतो. जर ते पूर्ण असतील तर आपणहि पूर्ण होऊं शकतों. पूर्ण असलेला माणूस तर्क करीत नाही किंवा आपण ज्याला 'जाणणें' म्हणतों त्या अर्थाने तो जाणत नाही, कारण आपलें सगळें ज्ञान तुलनात्मक असतें आणि निरपेक्ष सत्यांच्या बाबतींत तुलना किंवा वर्गीकरण यांना वावच नसतो. बुद्धीइतक्या चुका सहजप्रवृत्तीकडून होत नसतात, तरीपण बुद्धि ही सहजप्रवृत्तीहून श्रेष्ठ आहे. त्याचप्रमाणे अन्तर्दृष्टि ही बुद्धीहून श्रेष्ठ असून बुद्धींतूनच आपण तिच्याकडे पोहोचतों. ज्ञान हें अन्तर्दृष्टीचें जनक आहे व अन्तर्दृष्टि ही सहजप्रवृत्तीप्रमाणेच अचूक आहे, पण ती तिच्यापेक्षा उच्च पातळीवरील आहे. सजीव प्राण्यांमधे ज्ञानाच्या अभिव्यक्तीच्या तीन पातळ्या असतात. (१) नेणीव--यंत्रवत् व अचूक; (२) जाणीव--ज्ञानयुक्त पण कधी कधी चूक करणारी, (३) जाणिवेपलीकडील अवस्था --अन्तर्दर्शनात्मक व अचूक यांचें प्रत्यंतर अनुक्रमें पशु, माणूस व ईश्वर यांच्यांत येत असतें. पूर्णत्वास पोहोचलेल्या माणसाला आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्याव्यतिरिक्त कांहीहि कर्तव्य नसतें. तो जगाच्या कल्याणासाठीच जगत असतो. स्वत:साठी तो कांहीहि इच्छीत नाही. जें भेद निर्माण करतें तें अभावात्मक असतें. जें भावात्मक असतें तें अत्यंत व्यापक व समावेशक असतें. जें सगळ्यांमधे विद्यमान आहे तें सर्वव्यापक आहे. आणि तेंच

'सत्' होय.

"'दृश्य घटनांच्या परंपरेचें मनाने दिलेलें संक्षिप्त स्पष्टीकरण म्हणजेच 'नियम' होय." पण एक वस्तु या रूपांत नियमाला कांही अस्तित्व नाही. दृश्य जगांतील कांही घटनांच्या नियमित परंपरेचा निर्देश करण्यासाठीच या शब्दाचा आपण प्रयोग करतों. नियमाला अंधश्रद्धेचें रूप देणें योग्य नाही. नियम हा अनिवार्य असून त्याचा डोळे मिटून स्वीकार केलाच पाहिजे असें समजणें बरोबर नाही. बुद्धीबरोबर चुका असणारच, पण चुकांवर विजय मिळविण्यासाठी केलेल्या प्रयत्नानेच आपल्याला ईश्वरत्व प्राप्त होतें. शरीरांत असलेल्या दोषांच्या निराकरणासाठी शरीर जो संघर्ष करतें त्याचेंच नांव 'रोग' हें आहे. तसेंच आपल्यामधील ईश्वरत्व हें पशुत्व काढून टाकण्यासाठी जो प्रयत्न करतें त्याचेंच नांव 'पाप' हें होय. आपण 'पाप' म्हणजे चुका केल्याच पाहिजेत, कारण चुकांतूनच आपल्याला ईश्वरत्वाकडे जातां येतें.

कोणावरहि दया दाखवूं नका. आपण स्वतः व इतर सगळे-जण समान आहेत असें समजा व आपल्यामधील विषमतारूपी मूल-भूत पाप काढून टाका. आपण सगळे समान असल्यामुळे 'मी चांगला आहें आणि तूं वाईट आहेस, आणि मी तुझा उद्धार करण्याचा प्रयत्न करीत आहें' असें कोणींहि समजणें योग्य नाही. समत्व हें मुक्ताचें लक्षण आहे. येशू ख्रिस्त हे सामान्य व पापी अशा लोकांकडे जाऊन त्यांच्यामधे राहिले होते. ते स्वतःला इतरांहून श्रेष्ठ समजत नसत. फक्त पाप्यांनाच पाप दिसतें. माणसाकडे पाहूं नका, त्याच्यांतील ईश्वराकडेच लक्ष द्या. आपला स्वर्ग आपणच निर्माण करतों व नरकांतहि आपणच स्वर्ग निर्माण करूं शकतों. पापी लोक केवळ नरकांतच दिसून येतात, आणि जोंपर्यंत ते आपल्याला

आपल्याभोंवती दिसत असतात तोंपर्यंत आपण स्वत: नरकांतच असतों. आत्मा देशकालातीत आहे. 'मी सच्चिदानंदस्वरूप आहें, मी ब्रह्म आहें' याचा साक्षात्कार करून घ्या. जन्माचा आनंद माना, मृत्यूचाहि आनंद माना, ईश्वरावरील प्रेमानें सर्वदा आनंदच अनुभवा. देहबंधनापासून सुटका करून घ्या. आपण देहाचे दास झालों आहोंत; आपल्या शृंखलांना आपण कवटाळूं लागलों आहोंत आणि आपलें दास्य आपल्याला आवडूं लागलें आहे. इतकें की हें दास्य टिकून राहावें व आपला देहबोध चिरकाल टिकून राहावा अशी आपली इच्छा असते. देहबोधाला चिकटूं नका. या जीवना-सारख्या दुसऱ्या भावी जीवनाची इच्छा मुळीच बाळगूं नका. देहावर प्रेम किंवा देहाची इच्छा करूं नका. आपल्या प्रिय व्यक्तीं-च्या देहावरहि प्रेम करूं नका. हें जीवन आपला शिक्षक आहे आणि मृत्यूमुळे फिरून शिक्षण सुरू करण्याची संधि मिळते. शरीर हें आपला शिक्षक आहे, पण आत्महत्त्या करणें हा मूर्खपणा आहे, कारण त्यामुळे आपण आपल्या शिक्षकालाच ठार मारतों. त्याची जागा दुसरा शिक्षक घेईल. म्हणून जोंपर्यंत देहापलीकडे जाण्यास आपण शिकत नाहीं तोंपर्यंत आपल्याला देहाची आवश्यकता आहे. एक शरीर गेलें की त्याच्या जागीं दुसरें येईल. तरीपण आपण शरीराशीं एकरूप होतां कामा नये. पूर्णत्वप्राप्तीचें केवळ एक साधन म्हणूनच आपण त्याच्याकडे पाहिलें पाहिजे. प्रभु रामचंद्रांचा भक्त हनुमान याने आपलें तत्त्वज्ञान पुढील शब्दांत मांडले आहे–"प्रभो, जेव्हा स्वत:ला मी देह समजतों तेव्हा मी तुमच्यापासून नित्य भिन्न असा तुमचा दास असतों. जेव्हा मी स्वत:ला जीव समजतों तेव्हा स्फुलिंग हा जसा अग्नीचा अंश असतो तसा मी तुमचा अंश असतों. पण जेव्हा माझ्या ठायीं आत्मबुद्धीचा उदय होतो तेव्हा तुम्ही आणि

मी एक होऊन जातों." * म्हणून ज्ञानी हा केवळ आत्मसाक्षात्कारासाठीच प्रयत्न करीत असतो--आणखी कशासाठी नव्हे.

---

* देहबुद्धया तु दासोऽहं जीवबुद्धया तदंशकम् ।
आत्मबुद्धया त्वमेवाहं इति मे निश्चिता मतिः ।।

# प्रवचन सहावें

"विचार हे महत्त्वाचे आहेत, कारण 'आपण जसा विचार करतों तसेंच आपण होतों.'" एके काळीं एक संन्याशी होता. तो एका झाडाखाली वसून लोकांना उपदेश देत असे. तो दूध पीत असे व केवळ फळें खात असे आणि सतत 'प्राणायाम' करीत असे. आपण फार पवित्र आहोंत असें त्याला वाटे. त्याच गावांत एक वाईट चालीची बाई राहत असे. दररोज तो संन्यासी त्या बाईकडे जाऊन तिला समजावून सांगे की पाप करीत राहिल्याने तिला नरकांत पडावें लागेल. ती गरीब बाई आपली जीवनपद्धति बदलूं शकत नव्हती, कारण तोच तिच्या उदरनिर्वाहाचा एकमात्र उपाय होता. तरीपण संन्याशाने रंगविलेलें आपल्या भवितव्याचें भयंकर चित्र पाहून ती घाबरून जात असे. ती रडून ईश्वराची प्रार्थना करी, "देवा, मला माझा मार्ग बदलतां येत नाही याबद्दल क्षमा कर." कांही काळानंतर तो संन्यासी व ती बाई दोघेहि वारले. देवदूत येऊन त्या बाईला स्वर्गांत घेऊन गेले, पण त्या संन्याशाला मात्र यमदूत नरकांत घेऊन जाण्यासाठी तयार झाले. संन्याशाने त्यांना विचारलें, "असें कां ? मी अत्यंत पवित्र आयुष्य कंठलें नाही काय ? आणि मीं सर्वांना पावित्र्याचा उपदेश केला नाही काय ? मला नरकाकडे कां नेण्यांत येत आहे आणि या दुष्ट बाईला मात्र स्वर्गांत कां नेलें जात आहे ?" यमदूत उत्तरले, "कारण या बाईला दुष्कर्म करणें जरी भाग पडलें तरी तिचें मन नेहमी ईश्वराकडे लागलेलें असे. ती नेहमी मुक्तीची इच्छा करीत असे.

आता तिला मुक्ति मिळणार आहे. पण याच्या उलट तूं मात्र सत्कर्म करीत असतांनाहि तुझें मन नेहमी इतरांच्या दुष्कर्माकडेच लागलेलें असायचें तुला नेहमी पापच दिसत असे व तूं नेहमी पापाचाच विचार करीत असायचा. म्हणून तुला आता अशा ठिकाणीं नेलें जात आहे की जिथे पापच वास करतें" या गोष्टीचें तात्पर्य स्पष्टच आहे. बाह्य जीवनाचा कांहीं उपयोग नाही. हृदय शुद्ध असलें पाहिजे. आणि शुद्ध हृदयाला केवळ शुभच दिसतें, त्याला अशुभ दिसत नाही. मानवजातीचे रक्षक होण्याचा आपण कधी आव आणूं नये, किंवा पाप्यांचा उद्धार करण्याचा संतपणाहि आपण दाखवितां कामा नये. आपलेंच मन शुद्ध ठेवण्याचा आपण प्रयत्न करावा. याचा परिणाम असा होईल की आपल्याकडून इतरांचें हित होईल.

भौतिक शास्त्र हें दोन्ही बाजूंनी अध्यात्माने वेढलेलें आहे. असेंच तर्कबुद्धीचें आहे. तर्कबुद्धीचा उगम तिच्याहून वेगळ्या अशा तत्त्वांतून होतो व तिचा शेवटहि तिच्याहून वेगळ्याच तत्त्वांत होतो. अनुभवगम्य विश्वाचा आपण खोलवर विचार करूं लागलों तर अनुभवापलीकडील पातळीवर आपण जाऊन पोहोचूं. तर्कबुद्धि म्हणजे अनुभवाचेंच वर्गीकृत व स्मृतीने सुरक्षित ठेवलेलें असें संचित रूप आहे. आपण इंद्रियगम्य अनुभवांच्या पलीकडचा विचार किंवा कल्पना कधीच करू शकत नाहीं तर्कबुद्धीपलीकडे जें आहे तें इंद्रियज्ञानाचा विषय होऊं शकत नाही. तर्कबुद्धीचें मर्यादित स्वरूप आपल्याला जाणवतें, पण तीच आपल्याला अशा एका पातळीवर आणून सोडते की जिथे तर्कबुद्धीपलीकडील गोष्टींचें आपल्याला ओझरतें दर्शन घडतें. मग असा प्रश्न उद्भवतो की "माणसाजवळ तर्कबुद्धीच्या पलीकडे असलेलें असें एखादें साधन

आहे काय ?" तर्कबुद्धीच्या पलीकडे जाण्याचें सामर्थ्य माणसांत आहे हें बरेंच संभवनीय आहे. खरें पाहतां सर्व काळांतील सर्व संतांनी स्वतःच्या ठायीं हें सामर्थ्य असल्याची ग्वाही दिली आहे. पण आध्यात्मिक भाव व अनुभव यांचें तर्कबुद्धीच्या भाषेंत वर्णन करणें हें स्वभावतःच अशक्य आहे. आणि हे सगळेच सत्पुरुष आपले आध्यात्मिक अनुभव वर्णून सांगणें अशक्य आहे असें म्हणतात भाषाहि त्यांना त्यासाठी उपयोगी पडूं शकत नाही म्हणून येवढेंच म्हणतां येईल की हे त्यांचे प्रत्यक्ष अनुभव असून ते सगळ्यांनाच प्राप्त होऊं शकतात. अशा तऱ्हेनेच ते ज्ञात होऊं शकतात, पण त्यांचें वर्णन करणें अशक्य आहे. मानवांतील अतींद्रिय सत्तेच्या साहाय्याने प्रकृतींतील अतींद्रिय सत्तेचें ज्ञान प्राप्त करून देण्याचें शास्त्र म्हणजेच धर्म होय. मानवाच्या बाबतींत अजून आपल्याला फार थोडें ज्ञान झालें आहे; म्हणून विश्वाबद्दलहि आपण फार थोडें जाणूं शकलों आहोंत मानवाबद्दल अधिक ज्ञान मिळविल्यावर विश्वाबद्दलहि आपल्याला कदाचित् अधिक ज्ञान मिळवितां येईल. माणूस हा सर्व पदार्थांचें सार असल्यामुळे सर्व ज्ञान त्याच्यांतच आहे. विश्वाचा जो अत्यंत अल्प अंश इंद्रियगम्य आहे त्याचेंच कारण आपण ठरवूं शकतों. पण कोणत्याहि मूलभूत तत्त्वाचें कारण आपण ठरवूं शकत नाहीं. कोणत्याहि गोष्टीचें कारण ठरविणें म्हणजे तिचें वर्गीकरण करून तिला मनाच्या एका कप्प्यांत ठेवणें होय. एखादी नवी गोष्ट आढळली की आपण तावडतोब तिला एखाद्या पूर्वपरिचित वर्गांत समाविष्ट करण्याचा प्रयत्न करतों आणि अशा प्रयत्नालाच तर्कबुद्धीचें कार्य म्हणतात जेव्हा एखादी गोष्ट अशा प्रकारें एखाद्या वर्गांत आपल्याला समाविष्ट करतां येते तेव्हा आपल्याला एक-

प्रकारचें समाधान वाटतें. पण या वर्गीकरणाच्या द्वारें आपण भौतिक पातळीच्या पलीकडे कधीच जाऊं शकत नाहीं. माणूस इंद्रियांच्या मर्यादेच्या पलीकडे जाऊं शकतो याची निश्चित साक्ष भूतकाळ देत आहे. पांच हजार वर्षांपूर्वी उपनिषदांनी सांगितलें होतें की ईश्वराचें दर्शन इंद्रियांच्या द्वारें कधीच होऊं शकत नाही. येथपर्यंत आधुनिक अज्ञेयवाद या विचारसरणीशीं जुळतो. पण वेद हे या निषेधात्मक कल्पनेच्याहि पलीकडे जाऊन अगदी स्पष्ट शब्दांत सांगतात की माणूस हा इंद्रियांनी मर्यादित असलेल्या ह्या बर्फाप्रमाणे थिजलेल्या जड विश्वाच्या पलीकडे जाऊं शकतो आणि जातोहि. तो जणु या बर्फांत एक भोक शोधून त्यामधून जीवनाच्या संपूर्ण महासागरामधे प्रवेश करूं शकतो. अशा रीतीने इंद्रियगम्य विश्वाच्या पलीकडे गेल्यानेच माणूस आपल्या आत्म्याची प्राप्ति करून घेऊन आपण वस्तुत: कोण आहोंत याचा साक्षात्कार करून घेऊं शकतो.

खरें ज्ञान हें कधीच इंद्रियज्ञान असत नाही. आपण ब्रह्म जाणूं शकत नाहीं, पण आपण ब्रह्मच आहोंत—पूर्ण ब्रह्म आहोंत, त्याचा अंश नव्हे. जें परिमाणरहित आहे तें विभक्त होऊं शकत नाही. दृश्यमान विविधता ही स्थलकालांमधे दिसून येणारें ब्रह्माचे केवळ प्रतिबिंब आहे. जसें सूर्याचें प्रतिबिंब लाखो दंवबिंदूंमधे दिसतें, पण सूर्य मात्र अनेक नसून एकच असतो तसेंच हें आहे. खऱ्या ज्ञानामधे विविधतेचा लोप करून एकत्वच पाहावें लागतें. या अवस्थेंत विषय, विषयी किंवा जाणणें उरत नाही; तो, तूं किंवा मी उरत नाहीं; उरतें केवळ एकमेव निरपेक्ष सत्ताच. आपण सदासर्वदा ही सत्ताच आहोंत. एकदा मुक्त तर सर्वदाच

मुक्त. कार्यकारणभावाच्या नियमाने माणूस बद्ध नाही. दुःख व दैन्य हीं माणसांत नाहींत, तीं म्हणजे सूर्यावरून जाणारे व त्याला झाकून टाकणारे जणुकांही ढग आहेत. पण हे ढग निघून जातात आणि सूर्य मात्र तसाच असतो. माणसाचेंहि असेंच आहे. तो जन्मत किंवा मरत नाही, तो स्थल-कालांत नाही. या साऱ्या म्हणजे केवळ मनाच्याच कल्पना होत, पण आपण त्यांना सत्य समजतों आणि म्हणून त्यांनी झाकून टाकलेलें उज्ज्वल सत्य आपल्याला दिसत नाही. काळ हा विचार करण्याची आपली एक पद्धति आहे, पण आपण मात्र शाश्वत वर्तमानकाळच आहोंत. चांगलें व वाईट यांचें अस्तित्व सापेक्ष आहे--आपल्याच अपेक्षेने तीं अस्तित्वांत आहेत. त्यांच्यापैकी एक दुसऱ्याशिवाय असूं शकत नाही, कारण एकाला दुसऱ्याहून वेगळें असें अस्तित्व किंवा अर्थ नाही. जोंवर आपण द्वैतबुद्धि बाळगतों किंवा ईश्वर व मानव यांना वेगळे मानतों तोंवर चांगलें-वाईट हें आपणाला दिसणारच. मध्यबिंदूंत पोहोचून ईश्वराशीं एकत्व प्राप्त करूनच आपण इंद्रियांच्या भ्रमापासून आपली सुटका करून घेऊं शकतों. वासनेची संतत धगधग शांत केल्यानेच, कधीहि स्वस्थ बसूं न देणारी तृष्णा कायमची शांत केल्यानेच चांगल्यावाइटापासून आपली सुटका होईल, कारण मग आपण या दोहोंच्या पलीकडे गेलेले असूं. अग्नींत तेल ओतल्याने तो जसा आणखी भडकतो तशीच वासनेच्या तृप्तीने वासना अधिकच वाढते. मध्यबिंदूपासून आपण जितके दूर असतों तितक्या अधिक वेगाने चाक फिरतें व तितकीच कमी विश्रांति आपल्याला मिळते. मध्यबिंदूजवळ जा, वासनांचा संयम करा, त्यांचें निर्मूलन करा. खोटा ‘ अहं ’ टाकून द्या म्हणजे तुमची दृष्टि शुद्ध होईल व तुम्हांला ईश्वराचें दर्शन

घडेल. या जीवनाच्या व सर्व प्रकारच्या पारलौकिक जीवनाच्या त्यागानेच आपण अशा अवस्थेप्रत पोहोचूं की जिथे आपण आपल्या खऱ्या स्वरूपांत दृढपणें प्रतिष्ठित होऊं. जोंपर्यंत मनांत आपण आशा बाळगून असतों तोंपर्यंत वासनेचा आपल्यावर पगडा असतो. क्षणापुरतेंच का होईना, सर्व आशा टाकून द्या, म्हणजे अज्ञानाचें धुकें विरून जाईल. जर आपणच सर्वकांही आहोंत तर कशाची आशा बाळगायची ! सर्वस्वाचा त्याग करून आत्मतृप्त होऊन राहणें हेंच ज्ञानयोगाचें रहस्य आहे. 'नाही' म्हणा म्हणजे तुम्हीहि 'नाही' होऊन जातां; 'आहे' म्हणा म्हणजे तुम्हीहि 'आहे' होऊन जाल. अंतरात्म्याची उपासना करा. अंतरात्म्या-व्यतिरिक्त कांहीहि अस्तित्वांत नाही. जें जें बंधनकारक आहे तें तें सर्व माया आहे--भ्रम आहे.

मराठी ग्रंथ ... ग्रंथालय ... वि ...
अनुक्रम ... नोंद दि...
क्रमांक...

# प्रवचन सातवें

विश्वांतील सर्व पदार्थ सापेक्ष आहेत--आत्म्यामुळेच या सर्व पदार्थांना अस्तित्व आहे. पण आत्मा स्वत: मात्र निरपेक्ष आहे. आपण आत्मा आहोंत हें ज्ञान होतांच आपण मुक्त होऊन जातों. मर्त्य जीव या रूपाने आपण मुक्त नाहीं व कधी होऊंहि शकत नाहीं. मुक्त मर्त्यता हा वदतो व्याघात आहे, कारण मर्त्यता परिवर्तनाशिवाय असूं शकत नाही, आणि अपरिवर्तनीय वस्तुच मुक्त असूं शकते. आत्माच मुक्त असतो व तोच आपलें सत्यस्वरूप होय. या आंतरिक मुक्तीचा आपल्याला अनुभव येत असतो. सर्व प्रकारचे सिद्धान्त किंवा मतवाद कांहीहि म्हणोत, आपल्याला या सत्याची जाणीव असतेच व आपली प्रत्येक कृति या ज्ञानाची साक्ष देत असते. इच्छाशक्ति ही स्वाधीन नाही, तिची भासमान स्वाधीनता ही सत्याचें केवळ प्रतिबिंब असते. जग जर कार्यकारणाची अनंत परंपराच असेल तर माणसाने कुठं उभें राहून जगाला साहाय्य करावें ? यांतून कुणालाहि वांचविण्यासाठी वांचविणाऱ्याला उभें राहण्यापुरती कोरडी जागा असणें आवश्यक आहे; नाहीतर तो प्रवाहांत वाहत जाणाऱ्याला बाहेर कसें ओढून काढील व त्याला बुडण्यापासून कसें वांचवील ? 'मी एक क्षुद्र किडा आहें' असा आक्रोश करणाऱ्या धर्मवेड्या माणसाला सुद्धा असें वाटत असतें की मी सत्पुरुष होण्याच्या मार्गावर आहें. त्याला क्षुद्र किड्यामधेदेखील सत्पुरुष दिसत असतो.

मानवी जीवनाची दोन उद्दिष्टें किंवा लक्ष्यें आहेत--खरें

ज्ञान किंवा विज्ञान आणि आनंद. मुक्तीशिवाय हीं दोन्हीं प्राप्त होऊं शकत नाहीत. हीं दोन्हीं संपूर्ण जीवनाचे निकष आहेत. अनंत एकत्वाचा आपल्याला इतका तीव्र प्रत्यय आला पाहिजे की सर्व पाप्यांसाठी आपल्याला दुःख वाटलें पाहिजे, आपल्याला अशी जाणीव झाली पाहिजे की आपणच तें पाप करीत आहोंत. स्वार्थ-त्याग हाच शाश्वत नियम आहे, स्वार्थपरता नव्हे. जर सर्वकांही एक आहे तर मग आपण कोणता स्वार्थ बाळगावा ? या जगांत अधिकार म्हणून कांही नाही, सर्वकांही प्रेममय आहे. येशू ख्रिस्तांनी ज्या महान् सत्यांचा उपदेश केला त्यांचें कधीच प्रत्यक्ष आचरण केलें गेलें नाही. आपण येशूंचा मार्ग अनुसरून पाहूं या आणि त्यामुळे जगाचा उद्धार होतो किंवा नाही हें बघूं या. याहून विपरीत मार्गानें जगाचा प्रायः विनाशच झालेला आहे. निःस्वार्थताच आपल्यापुढील समस्येचें निराकरण करूं शकते, स्वार्थपरता नव्हे. अधिकाराची कल्पना ही मर्यादित कल्पना आहे. खरें पाहतां 'माझें' किंवा 'तुझें' असें कांहीच नाही, कारण मीच तूं आहें व तूंच मी आहेस. आपल्याला फक्त जबाबदाऱ्या आहेत, अधिकार नव्हे. 'मी अमुक पुरुष आहें' किंवा 'मी अमुक स्त्री आहें' असें न म्हणतां 'मी विश्व आहें' असें आपण म्हटलें पाहिजे. या सर्व मर्यादित कल्पना म्हणजे भ्रम असून त्यांच्या-मुळेच आपण बंधनांत सापडतों, कारण 'मी अमुक आहें' असा विचार आपल्या मनांत आल्याबरोबर आपल्याला कांही गोष्टी स्वतःसाठी राखून ठेवाव्याशा वाटतात आणि मग आपण 'मी' 'माझें' असें म्हणूं लागतों व असें म्हणतांना नवे नवे भेद निर्माण करीत जातों. या प्रत्येक नव्या भेदाबरोबर आपलें बंधनहि वाढत जातें आणि मग आपण त्या मध्यवर्ती एकत्वापासून, त्या अवि-

भाज्य अनंत तत्त्वापासून अधिकाधिक दूर जातों. एकच अखंड सत्ता आहे व आपण सर्वजण तीच सत्ता आहोंत. एकत्वांतच प्रेम व निर्भयता आहे. भेदांमुळे द्वेष व भय निर्माण होतात. एकत्वांतच सर्व नियमांची पूर्ति होते. या पृथ्वीवर आपण लहान लहान जागांभोवती भिंती उभारून इतरांना बाहेर ठेवूं पाहतों, पण आकाशाच्या बाबतींत असें करणें शक्य नाही. परंतु सांप्रदायिक धर्म असेंच करूं इच्छितात; ते म्हणतात की "आमच्याच मार्गानें मुक्ति प्राप्त होणें शक्य आहे, इतर सगळे मार्ग चुकीचे आहेत." या सर्व भिंती नाहीशा करणें, सीमा विस्तृत करीत करीत त्या नाहीशा करणें व सर्व धर्मांचें अंतिम लक्ष्य ईश्वरच आहे हें ज्ञान प्राप्त करणें हेंच आपलें ध्येय असलें पाहिजे. या क्षुद्र 'अहं'चा त्याग केलाच पाहिजे. नव्या जीवनाची दीक्षा देणें (बाप्तिस्मा), 'पुराण्या माणसाचा' मृत्यु व 'नूतन माणसाचा' जन्म हीं सारीं याच त्यागाचीं प्रतीकें होत. खोटया 'अहं'चा विनाश आणि संपूर्ण विश्वाच्या खऱ्या 'अहं'चा--आत्म्याचा साक्षात्कार हेंच या त्यागाचें स्वरूप आहे.

वेदांचे दोन महत्त्वाचे विभाग आहेत--कर्मकांड म्हणजे कर्माचा विचार करणारा विभाग व ज्ञानकांड म्हणजे शुद्ध ज्ञानाचा विचार करणारा विभाग. वेदांमधे धार्मिक कल्पनांच्या विकासाची संपूर्ण प्रक्रिया दिसून येते. याचें कारण असें की जेव्हा उच्च सत्यांचा शोध लागला तेव्हाहि त्या सत्यांप्रत घेऊन जाणारे खालच्या पातळीवरील अनुभव टाकून देण्यांत आले नाहीत. असें करण्याचें कारण पुढीलप्रमाणे होतें: ऋषींना ठाऊक होतें की सृष्टि अनंत असल्यामुळे ज्ञानाच्या प्राथमिक पायऱ्यांची आवश्यकता असणारे लोक जगांत नेहमीच राहतील, आणि सर्वोच्च

तत्त्वज्ञान सर्वांना खुलें असलें तरी तें सर्वांच्या आवाक्यांत येण्यासारखें नसतें. प्रायः इतर सर्वच धर्मांत सत्याचा केवळ अंतिम व सर्वोच्च अनुभवच संगृहित केलेला असतो. याचा साहजिकच असा परिणाम झाला आहे की जुने विचार नष्ट होऊन गेले आणि नवे विचार केवळ थोड्या लोकांनाच समजूं शकत होते. त्यामुळे बहुसंख्य लोकांना ते विचार अर्थशून्य वाटूं लागले. हा परिणाम जुन्या रूढि-परंपरा व जुने प्रमाणग्रंथ यांच्या विरुद्ध जी आज वाढती प्रतिक्रिया होत आहे तिच्यांत दिसून येतो. त्यांचा स्वीकार करण्याऐवजी आजचा माणूस धीटपणें त्यांच्या आधारांची व पुराव्यांची मागणी करतो. हें सारें कां मान्य करावें असें तो विचारतो. ख्रिस्ती धर्मांतला बराचसा भाग जुन्या अ-ख्रिस्ती लोकांचे विश्वास व रूढि यांना नवीं नांवें व नवा अर्थ दिल्यामुळेच तयार झाला आहे, जर जुने आधार कायम राखले गेले असते आणि वेळोवेळीं घडलेल्या परिवर्तनांचीं कारणें स्पष्टपणें मांडलीं गेलीं असतीं तर बऱ्याच गोष्टी अधिक स्पष्ट झाल्या असत्या. वेदांमधे जुने विचार रक्षिले गेले आहेत. त्यामुळे या विचारांचें स्पष्टीकरण करण्यासाठी व तें कां सुरक्षित ठेवले गेले हें विशद करण्यासाठी वेदांवर विस्तृत भाष्यें लिहावी लागलीं. हे जुने विचार रक्षिले गेल्यामुळे अनेक अंधविश्वासहि उत्पन्न झाले, कारण जुन्या कल्पनांचा अर्थ विसरून गेल्यानंतरहि लोक त्यांना चिकटून राहिले. अनेक अनुष्ठानांत अशा शब्दांचें पठन केलें जातें की जे आज कोणालाहि माहीत नसलेल्या भाषेंतलेच असून त्यांचा अर्थच आज कुणाला कळत नाहीं. इसवी सनाच्या बऱ्याच पूर्वीपासून क्रमविकासवादाची कल्पना वेदांनी मांडली होती, पण डार्विनने तिचें समर्थन केलें तोंपर्यंत तिला हिंदूंची केवळ एक

खुळचट समजूत म्हणूनच लेखण्यांत येत होतें.

बाह्य प्रार्थना व उपासना यांच्या विविध प्रकारांचा कर्मकांडांत समावेश होतो. या गोष्टी जर निष्काम भावाने केल्या आणि त्यांना केवळ बाह्य आचारांचें रूप येऊं न दिलें तर त्या चांगल्याच आहेत. त्यांनी चित्तशुद्धि होते. कर्मयोगी आपल्याआधी सगळ्यांनीच मुक्त व्हावें असें इच्छितो. इतरांना मोक्षप्राप्तीसाठी मदत करणें हीच त्याला आपली मुक्ति वाटते. "कृष्णाच्या भक्तांची सेवा करणें हीच सर्वश्रेष्ठ उपासना आहे." एका महान् संताने असें मागणें मागितलें आहे की "सर्व जगाचें पाप स्वत:वर घेऊन मी नरकांत गेलों तरी परवडेल, पण जगाचा मात्र उद्धार होवो." या खऱ्या उपासनेने स्वार्थत्यागाची परिसीमा गाठतां येते. एका महापुरुषाबद्दल असें सांगितलें जातें की तो आपलें सगळें पुण्य आपल्या कुत्र्याला देऊन टाकण्यास तयार होता, कारण त्या महापुरुषाची अशी इच्छा होती की तो कुत्रा फार स्वामिनिष्ठ असल्यामुळे त्याने स्वर्गास जावें व त्यासाठी आपण नरकांत पडलों तरी हरकत नाही.

ज्ञानकांडाचें सांगणें आहे की ज्ञानानेच मुक्ति प्राप्त होऊं शकते. याचा अर्थ असा की मुक्ति प्राप्त होईपर्यंत साधकाने ज्ञान प्राप्त करीत गेलें पाहिजे. ज्ञान हेंच मुख्य उद्दिष्ट आहे. ज्ञाता हा स्वत:लाच जाणत असतो. जो आत्मा एकमेव ज्ञाता आहे तो आपल्या विविध अभिव्यक्तींमधून स्वत:लाच जाणण्यासाठी प्रयत्न करीत असतो. आरसा जितका चांगला असेल तितकेंच त्यांतील प्रतिबिंब स्पष्ट असतें. माणूस हा एक उत्कृष्ट आरसा आहे. तो जितका शुद्ध होईल तितकें ईश्वराचें स्पष्ट प्रतिबिंब त्यांच्यांत पडेल. माणूस स्वत:ला ईश्वरापासून पृथक् करण्याची व स्वत:लाच

शरीर समजण्याची चूक करीत असतो. ही चूक मायेमुळे होते. माया ही शुद्ध भ्रान्ति नसून सत्याला त्याच्या स्वरूपांत न पाहतां त्याला निराळेंच कांहीतरी समजणें हीच माया होय. या देहात्मबुद्धीमुळे विषमता उत्पन्न होते व तिच्यापासून संघर्ष व मत्सर हे अनिवार्यपणें उत्पन्न होतात. आणि जोंपर्यंत आपल्याला विषमता दिसते तोंपर्यंत आपल्याला सुख लाभूं शकत नाही. "अज्ञान व विषमता हींच सर्व दु:खांचीं कारणें होत" असें ज्ञानयोगाचें सांगणें आहे.

जगाचे भरपूर धक्के खाल्यावर माणसाच्या ठायीं मुक्तीची इच्छा जागृत होते, आणि ऐहिक जीवनाच्या भकास चाकोरींतून बाहेर पडण्याचा मार्ग शोधत असतांना माणूस ज्ञानाकडे वळतो व आपल्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून घेऊन मुक्त होतो. त्यानंतर तो जगाकडे एक प्रचंड यंत्र म्हणून पाहूं लागतो, पण या यंत्राच्या चक्रांत आपला हात सापडूं नये याची मात्र तो पूर्ण खबरदारी घेतो. मुक्त झालेल्या माणसाला कांही कर्तव्य नसतें. मुक्ताचें नियंत्रण कोणती शक्ति करूं शकते? मुक्त माणूस सत्कर्मच करतो, कारण त्याचा स्वभावच तसा होऊन जातो. कोणत्याहि कल्पित कर्तव्याच्या प्रेरणेने तो सत्कर्म करीत नाही. पण जे इंद्रियांच्या बंधनांत सापडलेले आहेत त्यांना हें लागू नाही. जे क्षुद्र 'अहं'च्या पलीकडे गेले आहेत त्यांनाच मुक्ति प्राप्त होते. असा माणूस आपल्या आत्म्यांत प्रतिष्ठित असतो, तो कोणत्याहि नियमांच्या अधीन नसतो, तो मुक्त व पूर्ण असतो. जुन्या खुळचट समजुतींचा त्याग करून त्याने संसारचक्रांतून आपली सुटका करून घेतलेली असते. प्रकृति म्हणजे आपल्या आत्म्याचा आरसाच आहे. मानवी कर्मशक्तीला मर्यादा आहेत, पण वासनेला मर्यादा नाही.

म्हणून आपण स्वत: कर्म करण्याचें टाळून इतर लोकांच्या कर्मशक्तीचा उपयोग करून त्यांच्या परिश्रमांचें फळ भोगूं पाहतों. आपलें काम करून घेण्यासाठी यंत्रांचा शोध लावल्याने माणसाचें सुख कधी वाढत नाहीं, कारण वासनातृप्तीसाठी प्रयत्न केल्याने नवीन वासना निर्माण होतात आणि मग आपली हाव अधिकाधिक वाढूं लागते. वासनेच्या या वृद्धीला कांही अंत नाही. अतृप्त वासना उराशीं बाळगून मृत्युमुखीं पडल्यामुळे वासनातृप्तीच्या व्यर्थ प्रयत्नांत आपल्याला पुन:पुन: जन्म घ्यावा लागतो. "मानवजन्म प्राप्त होण्यापूर्वी ऐंशी लक्ष योनींतून आपण गेलों आहोंत" असें हिंदूंचें सांगणें आहे. ज्ञानयोग म्हणतो, "वासनांचा नाश करून त्यांच्यापासून सुटका करून घ्या." हाच एक मार्ग आहे. सर्व कार्यकारणभावापलीकडे जाऊन आत्मज्ञान प्राप्त करून घ्या. मुक्तीनेच माणसाला खरी नीतिमत्ता प्राप्त होते. जर कार्यकारणभावाची परंपरा अनंत काळ चालूं राहील तर निर्वाणाची प्राप्ति अशक्य होऊन बसेल. या परंपरेने जखडल्या गेलेल्या आभासमय 'अहं'चा विनाश म्हणजेच निर्वाण होय. कार्यकारणभावाच्या पलीकडे जाणें म्हणजेच मुक्ति होय.

आपलें खरें स्वरूप शुभ व मुक्त आहे. शुद्ध सत्ता हेंच आपलें खरें स्वरूप असून तें कधीच अशुद्ध होऊं शकत नाही किंवा वाईट कर्म करूं शकत नाही. जेव्हा आपण डोळ्यांच्या किंवा मनाच्या द्वारें ईश्वराचें ज्ञान मिळवतों तेव्हा त्याला आपण 'हें' किंवा 'तें' असें नांव देतों. पण खरें पाहूं गेल्यास केवळ एकच सद्वस्तु आहे. सर्व विविधता म्हणजे आपण केलेले एकाच सद्वस्तूचे निरनिराळे अर्थ होत. आपण नवीन असें कांही 'होत' नाहीं, आपण आपलें खरें स्वरूपच पुन: प्राप्त करून घेतों. 'अज्ञान

व जाति (विषमता)' हेंच दुःखाचें कारण आहे हें बुद्धदेवांचें सार-भूत मत वेदान्त्यांनी स्वीकारलें आहे, कारण हें मत इतर सर्व मतांहून श्रेष्ठ आहे. ह्या सर्वश्रेष्ठ महापुरुषाची अद्‌भुत अंतर्दृष्टि या मतांत अभिव्यक्त होते. म्हणून आपण साहसी व प्रामाणिक होऊं या. मग कोणताहि मार्ग आपण निष्ठेने व श्रद्धेने अनुसरला तर तो आपल्याला मुक्तीकडेच घेऊन जाईल. शृंखलेची एक कडी हातांत धरा म्हणजे सगळी शृंखला हळूहळू हातांत येईलच. झाडाच्या मुळांना पाणी घाला म्हणजे सगळ्याच झाडाला पाणी मिळेल. झाडाच्या प्रत्येक पानाला पाणी देण्यांत वेळ घालवणें व्यर्थ आहे. याचा अर्थ असा की ईश्वरप्राप्तीचा प्रयत्न करा. त्याची प्राप्ति झाली म्हणजे सर्वकांही मिळालें. संप्रदाय, धर्ममतें, वाह्य अनुष्ठानें हीं सर्व धर्माच्या कोवळ्या रोपट्याचें रक्षण करणारीं कुंपणेंच होत. पण नंतर या रोपट्याचें मोठें झाड होण्यासाठी आपल्याला हीं कुंपणें काढून टाकावींच लागतील. विभिन्न धर्म-संप्रदाय, वेद, बायबल इत्यादि धर्मग्रंथ हे धर्मरूपी रोपट्याच्या कुंड्याच होत, पण या कुंड्यांतून बाहेर पडून या रोपट्याने सर्व जगांत पसरलें पाहिजे.

ज्याप्रमाणे आपण पृथ्वींत आहोंत त्याचप्रमाणे आपण सूर्य, चंद्र, तारे इत्यादींमधेहि आहोंत असा अनुभव घेण्यास आपण शिकलें पाहिजे. आत्मा हा देशकालातीत आहे. प्रत्येक डोळा हा माझा डोळा आहे; भगवंताची आळवणी करणारें प्रत्येक मुख हें माझेंच मुख आहे; सर्व पापी लोक मीच आहें. आपण कोणत्याहि ठिकाणी बांधलेले नाहीं, आपण शरीर नाहीं. विश्व हें आपलें शरीर आहे. आपण सर्व वस्तूंना प्रतिबिंबित करणाऱ्या, शुद्ध व स्वतः कधीच परिवर्तन न पावणाऱ्या स्फटिकासारखे आहोंत.

आपण जादूची कांडी फिरवून आपल्यापुढे तऱ्हतऱ्हेचीं दृश्यें निर्माण करणारे जादूगार आहोंत, पण या सर्व दृश्यांच्या मागे जाऊन आपण आत्मज्ञान प्राप्त करून घेतलें पाहिजे. हें जग भांड्यांत उकळूं लागलेल्या पाण्यासारखें आहे. प्रथम एक बुडबुडा येतो, नंतर दुसरा, नंतर अनेक बुडबुडे येऊन सगळें पाणी उकळूं लागतें व त्याची वाफ होऊन ते उडून जातें. महान् आचार्य हे सुरवातीला उठणाऱ्या बुडबुड्यांसारखे असतात, म्हणजे एखादा इथे, एखादा तिथे असे ते दिसून येतात. पण शेवटीं प्रत्येक प्राण्याला बुडबुड्या-सारखे होऊन मुक्त व्हावें लागेल. सृष्टि नित्यनूतन असल्यामुळे ती रोज नवें नवें पाणी आणील व पुनःपुनः उकळण्याच्या प्रक्रियें-तून जाईल. बुद्ध व येशू ख्रिस्त हे जगाला परिचित असलेले दोन सर्वश्रेष्ठ बुडबुडे होत. ते महात्मे होते. स्वतः मुक्ति प्राप्त करून घेऊन त्यांनी इतरांना मुक्त होण्यास मदत केली. दोघेहि पूर्णपणें निर्दोष नव्हते; पण त्यांच्या गुणांवरूनच त्यांचें मूल्यमापन करा-वयास हवें, दोषांवरून नव्हे. येशूंच्या ठायीं कांही उणीव होती, कारण स्वतः शिकविलेल्या सर्वोच्च आदर्शानुसार ते नेहमीच वागले नाहीत. शिवाय त्यांनी स्त्रियांना पुरुषांच्या समान अधिकार दिले नाहीत. स्त्रियांनी त्यांच्यासाठी एवढें केलें, पण एकाहि स्त्रीला त्यांनी धर्मप्रचारक केलें नाही. सेमेटिक वंशांत त्यांचा जन्म झाला होता हेंच याचें निश्चित कारण होय. इतर महान् आर्यांप्रमाणे बुद्धांनी देखील पुरुष व स्त्री यांना समान दर्जा दिलेला आहे. आर्यांच्या दृष्टीने धर्मांत स्त्रीपुरुषभेदाला स्थान नाही. वेदांमधे व उपनिषदांमधे आपल्याला असें दिसून येतें की स्त्रिया सर्वश्रेष्ठ सत्यांचा उपदेश करीत व पुरुषांप्रमाणेच त्यांनाहि मान दिला जाई.

---

# प्रवचन आठवें

सुख व दुःख ह्या दोन्ही शृंखला होत. एक सोन्याची व दुसरी लोखंडाची. पण दोन्ही आपल्याला बांधण्यासाठी व आपल्या आत्मज्ञानाच्या आड येण्यासाठी सारख्याच समर्थ आहेत. आत्म्याला सुख किंवा दुःख नाही. या केवळ 'अवस्था' होत व अवस्था सतत बदलत असतात. अपरिवर्तनीय शांति व आनंद हेंच आत्म्याचें स्वरूप होय. तें आपल्याला प्राप्त करावयाचें नाही. तें आपल्याजवळ आहेच. आपल्या डोळ्यांतील मळ धुऊन काढला की आपल्याला त्याचा अनुभव येईल. आपण नेहमी आत्म्यांत प्रतिष्ठित राहून जगाच्या या दृश्याकडे अगदी शांतपणें पाहिलें पाहिजे. हा निव्वळ पोरांचा खेळ असून त्यामुळे आपण कधीहि विचलित होऊन जाणें योग्य नव्हे. जर स्तुतीने मन प्रसन्न होत असेल तर निंदेने तें दुःखी होईल. इंद्रियांचीं आणि मनाचींहि सर्व सुखें नश्वर असतात, पण निरपेक्ष असें एकमेव खरें सुख आपल्या आंतच असून तें कोणत्याहि बाह्य गोष्टीवर अवलंबून नाही. "आत्म्याच्या सुखालाच जग 'धर्म' हें नांव देतें." आपलें सुख जितक्या प्रमाणांत आपल्या आंत असेल तितके आपण अधिक धार्मिक असूं. आपण सुखासाठी जगावर अवलंबून राहूं नये.

कांही गरीब कोळिणी एका वादळांत सापडल्यामुळे एका श्रीमंत माणसाच्या बागेंत आश्रयार्थ गेल्या. त्या माणसाने त्यांना दयाळूपणें वागविलें, त्यांना जेवूं घातलें व त्यांना एक थंड खोली झोपावयास दिली. त्या खोलीच्या भोवती उत्कृष्ट फुलझाडें होतीं

व त्यांच्या फुलांचा सुगंध सगळीकडे पसरला होता. त्या सुगंधमय स्वर्गासारख्या ठिकाणीं त्या स्त्रिया पहुडल्या, पण त्यांना झोप येईना. त्यांना कांहीतरी चुकल्याचुकल्यासारखें वाटत होतें, म्हणून त्यांना कांही चैन पडेना. शेवटीं त्यांच्यापैकी एक बाई उठली व तिने मासोळ्यांच्या टोपल्या त्या झोपायच्या खोलींत आणून ठेवल्या आणि त्या परिचित वासाने आनंदित होऊन त्या सर्व कोळिणी गाढ झोपी गेल्या !

जगहि आपल्या दृष्टीने 'मासोळ्यांची टोपली' होऊं देऊं नका. या जगावर सुखासाठी अवलंबून राहूं नका. असें अवलंबून राहणें हे तमोगुणाने बद्ध असल्याचें लक्षण आहे. तमोगुण हा त्रिगुणांपैकी अत्यंत निकृष्ट असा गुण होय. तमोगुणी लोकांहून थोडे उच्च असे कांही लोक असतात. ते अहंकारी असून नेहमी 'मी' 'मी' करीत असतात. कधीकधी असे लोक सत्कर्मे करतात व ते धार्मिक बनूं शकतात. हे रजोगुणी वा क्रियाशील लोक होत. सर्वांहून उच्च असे जे लोक असतात ते अंतर्दृष्टिसंपन्न व सत्त्वगुणी असतात. ते नेहमी आत्म्यांतच वास करतात. हे तीन गुण प्रत्येक माणसामधे निरनिराळ्या प्रमाणांत वसत असतात. एकेका वेळीं एक एक गुण प्रबळ होतो. तमोगुणाला रजोगुणाने जिंकून या दोघांनाहि मग सत्त्वगुणांत विलीन करून टाकण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे.

सृष्टि म्हणजे कांहीतरी नवीन निर्माण करणें नसून विघडलेला समतोल पुन: प्राप्त करण्याचा तो प्रयत्न आहे. बुचाचे तुकडे पाण्याने भरलेल्या बादलींत तळाशीं टाकले की ते एकएकटे किंवा समूहाने वर उसळी मारून येतात आणि जेव्हा ते सर्व तुकडे पृष्ठभागावर येऊन समतोल प्राप्त करून घेतात तेव्हा सर्व गति किंवा

'जीवनसंग्राम' थांबतों. सृष्टीचेंहि असेंच आहे. सृष्टोमधे जर समतोल स्थापन झाला तर सर्व परिवर्तन थांबेल व ज्याला आपण जीवन म्हणतों तें समाप्त होऊन जाईल. जीवनामधे वाईट असणें अनिवार्य आहे, कारण एकदा समतोल प्रस्थापित झाला की जगाचा शेवट होईलच, कारण विनाश व एकरूपता हीं एकच होत. दुःखाशिवाय सुख व वाइटाशिवाय चांगलें मिळण्याची शक्यता नाही, कारण जोवन म्हणजेच समतोल बिघडलेली अवस्था होय. आपल्याला मुक्ति हवी आहे; जीवन किंवा सुख किंवा चांगलें हें आपल्याला नको आहे. सृष्टि ही नित्य आहे. ती अनादि, अनंत आहे. एका अनंत अशा सरोवरांतील सदैव गतिमान असलेली ती जणु लाट आहे. या सरोवरांत अजूनहि थांग न लागलेले असे अनेक सखाल भाग आहेत आणि इतरहि असे भाग आहेत की जेथील पाणी पुन: शांत झालें आहे, पण या सरोवरांतील लाट सतत पुढे जात आहे आणि पुनः समतोल प्राप्त करण्यासाठी चाललेले प्रयत्नहि अनंत आहेत. जीवन व मरण हीं एकाच गोष्टीचीं विभिन्न नांवें आहेत, एकाच नाण्याच्या त्या दोन बाजू आहेत. हीं दोन्ही मायाच होत--एका क्षणीं जीवनासाठी धडपड करणें व दुसऱ्या क्षणीं मरण्याचा प्रयत्न करणें अशी ही अनिर्वचनोय अवस्था असून तिचें स्पष्टीकरण देतां येत नाही. या सगळ्यांपलीकडे जीवाचें सत्य स्वरूप म्हणजे आत्मा आहे. सृष्टींत आपण जेव्हा प्रवेश करतों तेव्हा ती आपल्यापक्षीं सजीव होते. वस्तु या स्वत: निर्जीवच आहेत. आपणच त्यांना जिवंत करतों व मग मूर्खाप्रमाणे त्यांना भिऊन त्यांच्यापासून दूर पळतों किंवा त्यांचा उपभोग घेतों ! विश्व हें सत्यहि नाही व असत्यहि नाही, तें सत्याची पडछाया आहे. कवि म्हणतात की "कल्पना ही सत्याची सोन्याने मढवलेली

सावली आहे." अंतर्विश्व किंवा सत्य हें बाह्य विश्वापेक्षा अनंतपटीने श्रेष्ठ आहे, कारण बाह्य विश्व हें सत्याची केवळ पडछाया आहे. आपज जेव्हा दोरी पाहतों तेव्हा आपल्याला साप दिसत नाही आणि जेव्हा साप दिसतो तेव्हा आपल्याला दोरी दिसत नाही. दोन्ही एकाच वेळीं असूं शकत नाहीत. तसेंच जेव्हा आपण जग पाहतों तेव्हा आपल्याला आत्मदर्शन होत नसतें, त्या वेळीं आत्मा म्हणजे केवळ एक बौद्धिक कल्पनाच असते. ब्रह्मसाक्षात्कारांत अहंबोध व विश्वबोध हे दोन्ही पार नाहीसे होतात. प्रकाशाला अंधार माहीत नसतो, कारण अंधार हा प्रकाशांत कधी नसतोच. तद्वतच ब्रह्म हेंच सर्वकांही आहे. जेव्हा आपण ईश्वर मानतों तेव्हा खरें पाहतां आत्म्यालाच आपल्यापासून वेगळें करून आपण त्याची पूजा करीत असतों. पण तो सर्वदा आपलाच आत्मा असतो, आणि हा आत्माच एकमेव ईश्वर होय. जसें आहे तसेंच राहणें हा पशूंचा स्वभाव आहे, तर चांगल्याच्या मागे लागणें व वाईट टाळणें हा मानवाचा स्वभाव आहे. आणि कांहीहि मिळविण्याचा किंवा टाळण्याचा प्रयत्न न करतां नित्य आनंदरूप होऊन राहणें हा ईश्वराचा स्वभाव आहे. आपण ईश्वर होऊं या, आपलें हृदय महासागराप्रमाणे व्यापक करून या जगांतील क्षुद्र गोष्टींच्या पलीकडे आपण जाऊं या व जगाकडे केवळ चित्र म्हणून पाहूं या. तेव्हाच जगामुळे प्रभावित न होतां आपण त्याचा उपभोग घेऊं शकूं. जगांत चांगल्याचा शोध कां करावा ? तिथे आपल्याला काय सापडणार ? तिथे सगळ्यांत चांगलें जें सांपडेल तें चिखलांत खेळत असलेल्या मुलांना सापडणाऱ्या कांचेच्या मण्यांसारखेंच असणार. मुलें हे मणि पुनः हरवतात आणि पुनःपुनः त्यांना ते शोधावे लागतात अनंत सामर्थ्य हाच धर्म होय व हाच

ईश्वर होय. आपण मुक्त असलों तरच आपण आत्मा आहोंत. आपण मुक्त असलों तरच आपण अमर आहोंत. ईश्वर हा मुक्त असला तरच तो ईश्वर होय.

अहंकारनिर्मित अशा जगाचा जोंवर आपण त्याग करीत नाही तोंवर ईश्वराच्या राज्यांत आपला प्रवेश होऊं शकत नाही. आजवर कधीच कोणीं असा प्रवेश केला नाही व पुढेहि कोणी करूं शकणार नाही. जगाचा त्याग करणें म्हणजे 'अहं'चा त्याग करणें, त्याची आठवण देखील होऊं न देणें होय. जगाचा त्याग करणें म्हणजे शरीरांत राहूनहि शरीराच्या अधीन न होणें होय. हा दुष्ट 'अहं' नष्ट केला पाहिजे. जे शांत स्वभावाचे लोक दुसऱ्यांवर प्रेम करण्यासाठीच जिवंत असतात आणि जे आपल्या व्यक्तित्वाचा लोप करून टाकतात त्यांच्याच ठायीं मानवजातीचें हित करण्याचें सामर्थ्य असतें असे लोक कधी 'मी' 'माझें' म्हणत नाहीत. लोकांचे भलें करण्याचें साधन होण्यांतच त्यांना धन्यता वाटते असे लोक पूर्णपणें भगवंताशीं एकरूप झालेले असतात. ते कांही मागत नाहीत व 'मी कर्ता आहें' या भावनेने कांहीहि करीत नाहीत. ते खरे जीवन्मुक्त असतात, पूर्णपणें निःस्वार्थ असतात, त्यांचें सीमित व्यक्तित्व पूर्णपणें नष्ट झालेलें असते व त्यांच्या ठिकाणीं कोणतीहि महत्त्वाकांक्षा उरलेली नसतें. ते व्यक्तित्वरहित असें तत्त्व होऊन गेलेले असतात. आपण क्षुद्र 'अहं'चा जितका लोप करूं तितक्या जास्त प्रमाणांत ईश्वर आपल्यामधे प्रकट होईल. या क्षुद्र 'अहं'पासून आपण सुटका करून घेऊं या म्हणजे तो महान् 'अहं' वा ईश्वर आपल्या ठायीं वास करील. जेव्हा आपल्यामधून 'अहं'चा विचार पूर्णपणें नाहीसा होतो तेव्हाच आपल्या हातून

सर्वोत्कृष्ट कार्य होतें आणि आपला सर्वांत अधिक प्रभाव पडतो. वासनाशून्य व्यक्तीचें कर्मच अत्यंत फलदायी होतें. लोक जर तुमची निंदा करूं लागले तर त्यांना आशीर्वाद द्या. तुमच्यामधील मिथ्या अहंकाराचें निर्दालन करण्यांत तुम्हांला साहाय्य करून ते तुमचें किती हित करीत आहेत याचा विचार करा. आपल्या आत्म्याला दृढतेने धरून राहा, केवळ शुद्ध विचारच मनांत आणा; म्हणजे निव्वळ उपदेशकांच्या ताफ्याला जें कार्य करता येणार नाही तें तुम्ही संपन्न करूं शकाल. पावित्र्य व शांति यांच्यांतूनच सामर्थ्यशाली शब्द बाहेर पडत असतात.

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ११३८६ नों. ..........
वि. ...आ. ५१ क्र. ..............

# प्रवचन नववें

अभिव्यक्ति ही निश्चितच खालची अवस्था आहे, कारण भाव हा केवळ शब्दांच्या द्वारेंच अभिव्यक्त होऊं शकतो आणि सेंट पॉल यांनी म्हटल्याप्रमाणें "शब्द हे भावाचे मारक होत." शब्दांमधे चैतन्य असूं शकत नाही, शब्द हे केवळ प्रतिबिंब होत. तरीपण तत्त्वाचें ज्ञान होण्यासाठी तें जडद्रव्यांत आवृत करणें आवश्यक आहे. सत्य हें आवरणामुळे झाकलें जातें आणि आवरणाला प्रतीक समजण्याऐवजी आपण त्यालाच सत्य समजूं लागतों. ही चूक प्राय: सर्वचजण करीत असतात. सर्व थोर आचार्यांना हें माहीत असतें आणि ही चूक होऊं नये म्हणून ते सावध असतात. पण मानव हा सामान्यपणें अदृश्यापेक्षा दृश्याचीच पूजा बांधण्यास जास्त उत्सुक असतो. याच कारणास्तव एकामागून एक दिव्य दृष्टीचे अनेक आचार्य जगांत अवतरले व त्यांनी व्यक्तीमागील तत्त्वाकडे जगाचें लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. ह्या तत्त्वाला काळानुरूप नवीन प्रकारें आवृत करून त्यांनी तें लोकांपुढे मांडलें. सत्य हें नेहमी अपरिवर्तनीय असतें, पण तें व्यक्त करण्यासाठी त्याला कोणतें ना कोणतें रूप द्यावेंच लागतें. म्हणूनच वेळोवेळीं सत्याला नवीं नवीं रूपें देऊन तें व्यक्त केलें जातें. मानवजातीच्या उन्नतीनुसार ती ज्या रूपांत सत्य ग्रहण करूं शकते तें रूप देऊन तें सत्य व्यक्त केलें जातें. जेव्हा आपण नामरूपापासून आपली सुटका करून घेऊं, विशेषत: जेव्हा आपल्याला चांगलें किंवा वाईट, स्थूल किंवा सूक्ष्म अशा कोणत्याहि

प्रकारच्या शरीराची जरूरी वाटणार नाही तेव्हाच आपण बंधनांतून मुक्त होऊं, 'अनंत प्रगति' ही अनंत बंधनाचेंच लक्षण आहे. सर्व भेदांच्या पलीकडे जाऊन अनंत अशा एकत्वाप्रत किंवा साम्याप्रत किंवा ब्रह्माप्रत आपण पोहोचलें पाहिजे. आत्मा हा सर्व व्यक्तित्वांमधील एकत्व होय व तो अपरिवर्तनीय व एकमेवाद्वितीय असा आहे. आत्मा म्हणजे जीवन नसून तो जीवनाच्या रूपांत प्रकट होतो. तो जीवन-मृत्यू या व चांगल्यावाइटाच्या पलीकडे आहे. तो निरपेक्ष असें एकत्व आहे. सत्याच्या प्राप्तीसाठी नरकांतून जावें लागलें तरी सत्याचा शोध करण्याचें धाडस करा. जें नामरूपात्मक व सापेक्ष आहे तें कधीच मुक्त असूं शकत नाही. एकहि रूप असें म्हणूं शकत नाही की "मी रूप म्हणून मुक्त आहें." रूपाची कल्पनाच जोंवर नाहीशी होत नाही तोंवर मुक्ति प्राप्त होणार नाही. आपल्या मुक्तीचा इतरांना उपसर्ग पोहोचेल तर ती मुक्तिच नव्हे. आपल्यापासून इतरांना त्रास होतां कामां नये. खरें ज्ञान एकच असलें तरी सापेक्ष ज्ञान अनेक प्रकारचें असतें. क्षुद्रातिक्षुद्र मुंगीपासून तों सर्वश्रेष्ठ देवापर्यंत ज्ञानाचा मूळ स्रोत सर्वांमधेंच असतो. खरा धर्म एकच आहे. झगडे हे बाह्यानुष्ठानें, प्रतीकें व उदाहरणें यांच्यावरूनच होत असतात. ज्याला पाहण्याची दृष्टि आहे त्याच्या पक्षीं सत्ययुग आधीचेंच अस्तित्वांत आहे. वस्तुस्थिति ही आहे. की आपण स्वतःला गमावून बसल्यामुळे आपण जग गमावलें आहे असें आपल्याला वाटतें. "हे मूर्खा, तुला ऐकूं येत नाही काय ? तुझ्याच हृदयांत 'सच्चिदानंद सोऽहम् सोऽहम्' हें शाश्वत संगीत रात्रंदिवस गाइलें जात आहे !"

काल्पनिक रूपाशिवाय विचार करूं पाहणें हें अशक्याला शक्य करण्याच्या प्रयत्नासारखें आहे. प्रत्येक विचाराचे दोन भाग

असतात; ते म्हणजे विचार व शब्द हे होत, आणि आपण ते दोन्ही स्वीकारावयास हवेत. विज्ञानवादी व जडवादी हे दोघेहि विश्वाचें स्पष्टीकरण देऊं शकत नाहीत. त्यासाठी विचार व त्याचें अभिव्यक्त रूप या दोहोंचीहि मदत घ्यावी लागेल. आपण जसें आरशांतील स्वत:चें प्रतिबिंबच पाहूं शकतों तसेंच आपलें सर्व ज्ञान हें प्रतिबिंबित वस्तूंचेंच असतें. म्हणून आत्मा किंवा ब्रह्म यांचें कुणालाहि ज्ञान होऊं शकत नाही. पण प्रत्येकजण आत्माच आहे आणि या आत्म्याला ज्ञानाचा विषय बनविण्यासाठी त्याला प्रतिबिंबित रूपांतच पाहावें लागतें. त्या अदृश्य तत्त्वाला दृश्य रूपांत पाहण्याच्या प्रयत्नांतूनच तथाकथित मूर्तिपूजेची सुरवात झाली आहे. सामान्यत: लोक समजतात त्याहून मूर्तींचे प्रकार कितीतरी अधिक आहेत. लाकडी व दगडी मूर्तीपासून तों येशू ख्रिस्त किंवा बुद्धदेव यांच्यासारख्या महापुरुषांपर्यंत सर्व मूर्तिच आहेत. सगुण ईश्वराविरुद्ध बुद्धदेवांनी जो सतत उपदेश केला त्याचा परिणाम म्हणूनच भारतांत मूर्तिपूजेचा प्रारंभ झाला. वेदांमधे मूर्तिपूजेचा उल्लेख नाही, पण सृष्टिकर्ता आणि सखा अशा ईश्वराची कल्पना मागे पडल्यामुळे थोर आचार्यांच्या मूर्तींची पूजा करण्यांत येऊं लागली. आणि स्वत: बुद्धदेवच एक मूर्ति बनले आणि कोटच्यवधि लोक आज त्यांची त्या रूपांत पूजा करीत आहेत. जबरदस्तीने सुधारणेचा प्रयत्न केल्यामूळे परिणामीं खऱ्या सुधारणेची पिछेहाट होते. अर्चना-उपासना करणें हें मानवी स्वभावांतच आहे. केवळ सर्वोच्च तत्त्वज्ञानच अतींद्रिय अमूर्त तत्त्वापर्यंत पोहोचूं शकतें. म्हणून माणूस नेहमीच ईश्वराला सगुण रूप देऊन त्याची पूजा करील. प्रतीक कोणतेंहि असो, तें त्याच्या पाठीशीं असलेल्या ईश्वराचें प्रतीक आहे असें समजून--तें प्रतीकच

सारेंकांही आहे असें समजून नव्हे--त्याची पूजा केल्यास ती अर्थातच फार चांगली आहे. शास्त्रग्रंथांत सांगितलें आहे म्हणून कोणत्याहि गोष्टीवर विश्वास ठेवणें ह्या अंधविश्वासापासून स्वतःची सुटका करून घेणें हें सर्वांत जास्त आवश्यक आहे. विज्ञान, धर्म, तत्त्वज्ञान इत्यादींना कोणत्याहि एकाच शास्त्रग्रंथाचे आदेश पाळण्यास भाग पाडणें हा भयंकर जुलूम आहे. ग्रंथपूजा हा मूर्तिपूजेचा अत्यंत निकृष्ट प्रकार होय एकदा एक गर्विष्ठ आणि स्वच्छंद काळवीट आपल्या बच्च्याला तोऱ्याने म्हणाला, "पाहा, माझीं वळकट शिगें! हीं एकदाच खुपसून माणसाला मी ठार करूं शकतों. काळवीट होणें किती चांगलें आहे!" त्याच वेळीं एका शिकाऱ्याच्या तुतारीचा आवाज दूरवर रानांत घुमला आणि काळवीट धूम पळत सुटला. त्यामुळे चकित झालेला बच्चाहि त्याच्या मागोमाग पळत सुटला. ते दोघेहि जेव्हा एका बिनधोक जागीं येऊन पोहोचले तेव्हा बच्च्याने विचारलें, "बाबा, तुम्ही इतके बळकट व शूर असतांना माणसाला भिऊन कां पळत सुटलां?" काळविटाने उत्तर दिलें, "मुला, मी बळकट व सामर्थ्यवान आहें हें मला माहीत आहे, पण जेव्हा मी तो आवाज ऐकतों तेव्हा मला कांहीतरी होतें व इच्छा असो वा नसो, मी पळत सुटतों." आपलेंहि असेंच आहे. "शास्त्रांत हे नियम सांगितले आहेत" असा 'तुतारीचा आवाज' ऐकला की आपल्या जुन्या सवयी व अंधविश्वास उफाळून वर येतात आणि आपल्याला समजण्यापूर्वीच आपण दृढपणें बांधले जातों व आपलें खरें मुक्त स्वरूप विसरून जातों.

ज्ञान हें अनंत काळापासून विद्यमान आहे. ज्या माणसाला आध्यात्मिक सत्य गवसलें त्याला आपण 'प्रेषित' म्हणतों व त्याने

जगाला दिलेल्या ज्ञानाला 'ईश्वराची वाणी' असें नांव देतों. पण ही 'ईश्वराची वाणी' देखील अनंत आहे, म्हणून तिला अंतिम स्वरूपाची समजून तिचें अंधपणें अनुकरण करावयाचें नसतें. जो कोणी स्वतःला योग्य बनवील त्यालाहि 'ईश्वराची वाणी' प्राप्त होऊं शकते. पूर्ण पावित्र्य ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे, कारण "शुद्धहृदयी लोकांनाच ईश्वराचें दर्शन होईल." सगळ्या जीवांत माणूस हाच सर्वश्रेष्ठ असून ही पृथ्वीच सर्वश्रेष्ठ स्थान आहे, कारण इथेंच माणूस मुक्ति मिळवूं शकतो. माणूस हीच ईश्वराविषयीची सर्वोच्च कल्पना आहे. ईश्वराला जे गुण आपण लावतों ते माणसांतहि असतात, पण ते अल्प प्रमाणांत असतात एवढेंच. जेव्हा आपण अधिकाधिक उच्च पातळीवर जाऊन ईश्वराच्या ह्या कल्पनेच्या पलीकडे जातों तेव्हा आपल्याला या शरीराच्या, मनाच्या व कल्पनाशक्तींच्याहि पलीकडे जावें लागतें आणि या जगालाहि मागे टाकून पुढे जावें लागतें. त्या निरपेक्ष सत्तेशीं एकरूप झाल्यावर आपण या जगाचे राहत नाहीं. त्या अवस्थेंत सर्वकांही 'विषयी'--आत्मा--होऊन जातें, 'विषय' म्हणून कांही उरत नाही. या एकमेव ज्ञात अशा विश्वाचा माणूस हा शिरोबिंदु आहे. ज्यांनी पूर्णत्व किंवा साम्यावस्था प्राप्त करून घेतली "तें ईश्वरामधेंच वास करतात" असें म्हणतां येईल. 'आत्म्याचा आत्म्याने घात करणें' हेंच द्वेषाचें स्वरूप आहे. म्हणून प्रेम हाच जीवनाचा नियम होय. या अवस्थेप्रत येऊन पोहोचणें हेंच पूर्णत्व आहे. पण पूर्णत्वाकडे आपण जितके अधिक जाऊं तितकेंच कमी कर्म आपण करूं शकूं. सत्त्वगुणी लोक जाणून असतात की हें सगळें जग म्हणजे मुलांचा खेळ आहे, म्हणून ते जगासाठी आपलें डोकें शिणवीत नाहीत. कुत्र्याचीं दोन पिलें भांडतांना व एकमेकांना

चावतांना पाहून आपण विचलित होत नाही. आपल्याला माहीत असतें की ती एक क्षुल्लक गोष्ट आहे. पूर्ण माणूस जाणतो की हें विश्व म्हणजे माया आहे. जीवनाला 'संसार' असें म्हणतात परस्परविरुद्ध शक्तींचें आपल्यावर जें कार्य होतें त्याचा परिणाम म्हणजे हें जीवन होय. जडवाद म्हणतो, "मुक्तीची भावना म्हणजे एक भ्रम होय." आदर्शवाद म्हणतो, "बंधनाची कल्पनाच स्वप्न-वत् होय." वेदान्त म्हणतो, "आपण मुक्त आहोंत व नाहींहि." याचा अर्थ असा की पार्थिव स्तरावर आपण कधीच मुक्त नसतों, पण आत्म्याच्या बाजूने पाहिल्यास आपण नित्यमुक्त आहोंत. आत्मा हा बंध व मोक्ष या दोहोंच्या पलीकडे आहे. आपण ब्रह्मच आहोंत. आपण इंद्रियातीत असें अनंत ज्ञान आहोंत, आपण आनंदस्वरूप आहोंत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. बाबलाल शाखा.
अनुक्रमांक 06843 वि वाङ्मय
क्रमांक 34286 नोंद दि. 30/3/67

IRBK-0111386

IRBK-0111386

# आमचें अन्य प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| १-२. **श्रीरामकृष्ण चरित्र**--न. रा. परांजपेकृत | | रु. पै. |
| प्रथम भाग (चवथी आवृत्ति) | ... | ४.२५ |
| द्वितीय भाग (तिसरी आवृत्ति) | ... | ४.३७ |
| ३. **श्रीरामकृष्ण-वचनामृत**--श्री 'म'कृत (दुसरी आवृत्ति) | .. | ५.५० |
| ४. **भगवान श्रीरामकृष्णांच्या लीलासहधर्मिणी श्री सारदादेवी** | | ६.२५ |
| ५. **स्वामी विवेकानंद यांचें चरित्र**—(सुधारलेली दुसरी आवृत्ति) | | ७.२५ |
| ६. **साधु-नागमहाशय चरित्र** —(दुसरी आवृत्ति) | ... | २.०० |
| ७. **हिमालयाच्या कुशींत**--स्वामी अखंडानंद | ... | २.५० |
| ८. **श्रीरामकृष्ण-वाक्सुधा**—(पांचवी आवृत्ति) स्वामी ब्रह्मानंद द्वारा संकलित | .. | १.०० |
| ९. **स्वामी विवेकानंदांच्या आठवणी**—(दुसरी आवृत्ति) | ... | १.७५ |

## स्वामी विवेकानंदकृत पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| १०. **ज्ञानयोग** ... | ... | ४.०० |
| ११. **राजयोग** (पतंजलींचीं योगसूत्रें आणि त्यांचें सुबोध विवरण यांसह)--(दुसरी आवृत्ति) | ... | ३.४० |
| १२. **कर्मयोग**--(तिसरी आवृत्ति) | ... | २ १० |
| १३. **भक्तियोग**—(दुसरी आवृत्ति) | .. | १.७५ |
| १४. **प्रेमयोग** ... | ... | १ ७५ |
| १५. **सुबोध राजयोग** . . | ... | ०.६० |
| १६. **कोलंबो ते अल्मोरा** (भारतांत दिलेलीं व्याख्यानें) | ... | ६.२५ |
| १७. **स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत** | . . | ४.५० |
| १८. **स्वामी विवेकानंदांचीं पत्रें** | .. | ४.७५ |
| १९. **दैवी वाणी** (निवडक शिष्यांना दिलेला उच्च आध्यात्मिक उपदेश) | ... | २.७५ |
| २०. **आत्मसाक्षात्कार : साधना व सिद्धि** | .. | २.२५ |
| २१. **बुद्धदेवांचा जगाला संदेश आणि इतर व्याख्यानें** | . . | २.२५ |
| २२. **युरोपच्या प्रवासाची दैनंदिनी** | ... | २.२० |

म. ग्रं. स. ग्रंथालय शाखा
ग्रं. क्र.
दि. २

२३. धर्माचें विज्ञान आणि तत्त्वज्ञान .. २.००
२४. स्वामी विवेकानंद यांच्या मुलाखती व प्रश्नोत्तरें .. २.००
२५. भारतीय नारी (दुसरी आवृत्ति) .. २.००
२६ वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव .. १.७५
२७. महापुरुषांच्या जीवनकथा—(सातवी आवृत्ति) . १.६२
२८. भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्गीता .. १.६०
२९. स्वामी विवेकानंदाशीं संवाद आणि संभाषणें .. १.६०
३०. कविता .. १.५०
३१. उच्च जीवनाची साधना . १.५०
३२. वेदान्त आणि जीवन . १.२५
३३. पूर्व आणि पश्चिम . १.२५
३४. सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना .. १.००
३५. माझे गुरुदेव—(चवथी आवृत्ति) .. ०.९०
३६. शिकागो व्याख्यानें—(चवथी आवृत्ति) .. ०.९०
३७. आधुनिक भारत .. ०.९०
३८. पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व .. ०.६०
३९. हिंदुधर्माचें नव-जागरण—(दुसरी आवृत्ति) .. ०.५६
४०. शिक्षण—(दुसरी आवृत्ति) .. ०.५६
४१. पवहारी बाबा—(दुसरी आवृत्ति) .. ०.५०

## पॉकेटसाईज पुस्तकें

४२. माझें जीवन आणि कार्य—स्वामी विवेकानंद . ०.६५
४३. माझ्या मोहिमेची योजना—स्वामी विवेकानंद .. ०.५०
४४ उद्गार आणि बोधवचनें—स्वामी विवेकानंद .. १.००
४५. विवेकानंद वाणी—(चवथी आवृत्ति) .. ०.९०
४६. स्वामी विवेकानंद म्हणतात— .. ०.५०
४७. रामकृष्ण संघ—ध्येय व इतिहास—स्वामी तेजसानंद .. ०.७५

श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर-१.

स्वामी विवेकानंद शतवार्षिक जयंती स्मारक ग्रंथ

# स्वामी विवेकानंद ग्रंथावली

## एकूण १० खंड

**डबल डेमी १/१६ आकार : मोठा टाईप**

**सचित्र : आकर्षक जॅकेट**

**एकूण पृष्ठसंख्या सुमारें ६०००**

स्वामी विवेकानंदांच्या तहत आजपर्यंत प्रकाशित झालेल्या, आणि त्याचबरोबर अगदी नव्याने उपलब्ध झालेल्या व अद्याप अप्रकाशित अशा सर्व व्याख्यानांचा, प्रवचनांचा, ग्रंथांचा, लेखांचा, पत्रांचा, संवाद-संभाषणांचा, मुलाखतींचा, प्रश्नोत्तरांचा, कवितांचा व इतर सर्व प्रकारच्या साहित्याचा मूळ इंग्रजींतून आणि बंगालींतून केलेला अनुवाद प्रस्तुत "ग्रंथावली"च्या एकूण दहा खंडांमधे समाविष्ट करण्यांत आला आहे. स्वामी विवेकानंदांच्या समस्त इंग्रजी व बंगाली साहित्याचा हा प्रथमच प्रसिद्ध झालेला अधिकृत मराठी अनुवाद होय.

**कापडी बांधणी : प्रत्येकी ९ रु.; संपूर्ण संच ९० रु.**

**बोर्ड बांधणी : प्रत्येकी ७ रु.; संपूर्ण संच ७० रु.**

**रेल्वेचा किंवा पोस्टाचा खर्च निराळा.**

**श्रीरामकृष्ण आश्रम**

**धंतोली, नागपूर-१**

SHIV RAJ NAGPUR